www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक
# युवक आधार
मराठी




मुख्य संपादक - भारती आमले   उपसंपादक - श्री विलास गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश पाटील   सह संपादक - श्री मुकुंद कांबळे   महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3   अंक : 33   शनिवार दि. ११ ऑक्टोबर २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : ८   RNI MAHMAR/2023/89514

## रिसोड़ नगर परिषदेचे प्रभाग आरक्षण जाहिर.!

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी**
**वाशिम गजानन पवार पाटिल**

नगर परिषद निवडनुकीसाठी प्रभागनिहाय आरक्षण सोडत निवडनुक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर तथा सहाय्यक निवादनुक अधिकारी मुख्याधिकारी तथा प्रकाशक सतीश शेवदा यांच्या उपस्थितित न. प. सभाग्रहात पार पड़ली. या सोडतीस स्थानिक नागरिक, जनप्रतिनिधि तसेच विविध पक्षांचे कार्यकरते मोठ्या संखेने उपस्थित होते.

प्रभाग निहाय आरक्षण ठरविताना महिलासाठी, अनुसूंचित जाति - जमाती तसेच सामान्य प्रवर्गसाठी आरक्षित जागांची घोषणा कारण्यात आली. सोडती दरम्यान काहीं प्रभागा मध्यी आरक्षण बदलल्याने काही इच्छुक उमेदवारानी आनंद व्यक्त केला.

आगामी निवाडनुकित कोंनत्या पक्षाची बाजू मजबूत ठरेल , याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



या सोड़ती नंतर नगर परिषदेच्या राजकीय वातावरणात चैतन्य निर्माण झाले असुन, संभव्य उमेदवाराणी प्रचाराची रणनीति आखन्यास सुरूवात केली आहे. सदर आरक्षण सोडतील साठी लहान चीमूकल्या मुलीना चिठ्या काढून आरक्षण जाहिर करण्यात आले.

**प्रभाग निहाय आरक्षण**

प्रभाग क्रमांक १: अ) सर्वसाधारन महिला , ब) सर्वसाधारण,प्रभाग क्रमांक २: अ) अनु.जाति, ब) सर्वसाधारण महिला,प्रभाग क्रमांक ३: अ) नामाप्र, ब) सर्वसाधारण महिला , प्रभाग क्रमांक ४: अ) अनु.जाति महिला, व ) सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ५: अ) नामाप्र महिला, ब) सर्वसाधारण प्रभाग क्रमांक ६: अ) नामाप्र, ब) सर्वसाधारण महिला,प्रभाग क्रमांक ७: अ) नामाप्र महिला, ब) सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ८: अ) अनु. जाति महिला, ब) सर्वसाधारण प्रभाग क्रमांक ९: अ) नामाप्र, ब) सर्वसाधारण महिला. प्रभाग क्रमांक १०: अ) सर्वसाधारण महिला, ब) सर्वसाधारण , प्रभाग क्रमांक ११: अ) नामाप्र महिला, ब) सर्वसाधारण महिला, क) सर्वसाधारण.

## जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांसाठी "जागा आरक्षणाची सोडत" जाहीर

**दैनिक युवक आधार**
**प्रदीप पाटील महाराष्ट्र प्रतिनिधी**

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये अनुसूचित जाती/जमाती, नागरिक मागास वर्ग आणि स्त्रियांसाठी आरक्षित जागा निश्चित करण्यासाठी सोडत (ड्रा) पद्धतीने प्रक्रिया आयोजित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम,1961 मधील तरतुदीनुसार आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या (जागा आरक्षणासबंधीची पद्धत व चक्रानुक्रम) नियम,2025 नुसार ही कार्यवाही केली जाईल.

जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये ही प्रक्रिया एकाच दिवशी (13 ऑक्टोबर 2025 रोजी) सकाळी 11:00 वाजता आयोजित करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेसाठीची बैठक मात्र दुपारी 12 वाजता सुरू होईल.

सोडत सभेची ठिकाणे पुढीलप्रमाणे आहेत



- जिल्हा परिषद रायगड: नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड (दुपारी12 वाजता)
- पनवेल: आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फळके नाट्यगृह, पनवेल
- कर्जत: प्रशासकीय भवन, तहसलिदार कार्यालय, कर्जत
- खालापूर: छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, पंचायत समिती, खालापूर
- सुधागड: श्री बल्लाळेश्वर देवस्थान पाली भक्त निवास, क्र.1ता. सभागृह जि.रायगड
- पेण: उपविभागीय अधिकारी कार्यालय, पेण
- उरण: पंचायत समिती सभागृह, उरण
- अलिबाग: नगरपरिषद अलिबाग सभागृह, अलिबाग
- मुरुड: महाराष्ट्र भूषण डॉ.दि.शि. नानासाहेब धर्माधिकारी सभागृह, पंचायत समिती, मुरुड
- रोहा: ज्येष्ठ नागरिक सभागृह नगर परिषद, रोहा
- तळा: डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी सभागृह, पंचायत समिती, तळा
- माणगाव: मध्यवर्ती प्रशासकीय भवन तहसलिदार कार्यालय, माणगाव
- म्हसळा: पंचायत समिती सभागृह, पंचायत समिती, म्हसळा
- श्रीवर्धन: मध्यवर्ती प्रशासकीय भवन, पहिला मजला तहसलिदार कार्यालय, श्रीवर्धन
- महाड: बहुउद्देशीय हॉल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, महाड
- पोलादपूर: कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृह, पोलादपूर

(टीप: जिल्हा परिषदेची बैठक वगळता, उर्वरित सर्व ठिकाणच्या बैठका सकाळी 11:वाजता सुरू होतील.

या संदर्भातील कार्यवाही सोडत पद्धतीने करण्यात येणार असून, जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीतील ज्या रहिवाशांना सदर सभेस हजर राहण्याची इच्छा आहे, त्यांनी वरील नमूद केलेल्या ठिकाणी व वेळी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

## रक्तदान शिबिरासह मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**


श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्ट, श्री पुज्य सिंधी पंचायत ट्रस्ट पनवेल, विद्यार्थी वाहक संस्था पनवेल, पनवेल-नवी मुंबई प्रिंट आणि डिझिटल पत्रकार संघटना, आम्ही रक्तदाते पनवेलचे आणि पनवेल तालुका पत्रकार प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.12 ऑक्टोबर 2025 रोजी पनवेलमध्ये रक्तदान शिबीर व मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री पुज्य सिंधी पंचायत झुलेलाल मंदिर, डॉ.लिखीते हॉस्पिटल समोर, महात्मा गांधी पथ विश्राळी नाका पनवेल येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून सकाळी 9 ते दुपारी 3 वाजेपर्यंत हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. यावेळी अवयदान या विषयावर सुद्धा मार्गदर्शन केले जाणार नाही. अधिक माहितीसाठी अमोल साखरे 8652233771 किंवा पांडुरंग हुमणे 9324791532 येथे संपर्क साधावा.

## मुरुड - जंजिरा जलदुर्ग पर्यटकांसाठी खुला

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी नितीन लोखंडे**

**तळा :** मुंबई- पुण्यापासून काही अंतरावर असलेल्या रायगड जिल्ह्यातील मुरूड तालुक्यातील ऐतिहासिक जगप्रसिध्द मुरूड जंजिरा किल्ला दिनांक 5 ऑक्टोबर पासून पर्यटकांसाठी खुला करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तसेच देश-विदेशातील पर्यटकांनी या ठिकाणी येऊन ऐतिहासिक जलदुर्ग पाहण्याचा तसेच उंच फेसाळणाऱ्या लाटांचा आनंद घ्यावा. असे आव्हान मुरुड जंजिरा उपमंडळ भारतीय पुरातत्व विभागाचे अधिकारी सन्मा. Jai येलीकर साहेब यांनी दिली आहे. मिनी गोवा म्हणून ओळख असलेल्या मुरूड तालुक्यातील मुरुड बीच तसेच काशीद बीचवर पावसाळा संपल्यानंतर पर्यटक समुद्रातील फेसाळलेल्या लाटांचा आनंद घेण्यासाठी येत असतात. सुट्ट्यांच्या काळात बीचवर अलोट गर्दी पाहवयास मिळते. पर्यटक वाढल्यामुळे येथील बेरोजगारांना रोजगाराचे साधन उपलब्ध होत आहे.. हॉटेल व्यावसायिक, फोटोग्राफर, घोडागाडीवाले स्नॅक्सवाले, चॅटवाले, पानटपरी वाले यांना चांगले उत्पन्न मिळत असते. त्यामुळे मोठ्या प्रमाणामध्ये आर्थिक दैनंदिन उलाढाल होत असते. किल्ला पाहण्यासाठी राजपुरी जेटीवरून तसेच खोरा जेटीवरून बोटीने मौज मस्ती करत किल्ल्यापर्यंत पोहचता येते.



किल्याच्या चारही बाजूंनी समुद्राचा वेढा तसेच जलदुर्गाला धडकणाऱ्या उंच उसळणाऱ्या लाटा त्यामुळे पर्यटकांचे मन मुरुड शहराकडे आकर्षित होत आहे.

पर्यटक वाढल्यामुळे मुरुड शहर तसेच राजपूरीच्या परीसात पर्यटकांची गर्दीच गर्दी पहावयास मिळते.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते 'दिबां'चेच नाव मिळणार - लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ठाम विश्वास

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव दिले जाईल यात आमच्या मनात कोणतीही शंका नाही, असे प्रतिपादन सर्वपक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले आहे.



एका मुलाखतीदरम्यान बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी कृती समितीच्या बैठकीत सर्वांसमोर या विषयावर स्पष्ट भूमिका मांडली आहे. येत्या तीन महिन्यांच्या आत विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव लागलेले आपण पाहू. ते पुढे म्हणाले, आज जे विरोधक या दि.बा.च्या नावा संदर्भात शंका उपस्थित करत आहेत, त्यांनी पूर्वी लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावाबाबत काय भूमिका घेतली होती, हे सर्वांना ठाऊक आहे. त्यामुळे विरोधकांचा उथळपणा स्पष्ट दिसतो आणि उथळ पाण्याला नेहमी खळखळाट जास्त असतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वपक्षीय कृती समितीच्या बैठकीत दिलेल्या आश्वासनावर आम्हाला पूर्ण विश्वास असल्याचे सांगत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुन्हा एकदा ठामपणे सांगितले की, आपल्या देशातील मोदी सरकार आणि महाराष्ट्र राज्यातील फडणवीस सरकार आपल्या शब्दाचे पालन करणारे आहेत. निश्चितच विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचेच नाव लागेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## तुर्भे स्टोअर येथे आंबेडकरांविषयी आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या युवकावर अ‍ॅट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर रायगड**

**नवी मुंबई (तुर्भे स्टोअर)** – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट केल्याप्रकरणी कुमार चंदन सिंग या युवकाविरुद्ध अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा 1989 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ९ ऑक्टोबर २०२५ रोजी उघडकीस आली.

चंदन सिंग यांनी व्हॉट्सअ‍ॅप स्टेटसवर एक व्हिडिओ पोस्ट केला होता. त्या व्हिडिओमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी अपमानास्पद विधानं करण्यात आली होती, जसे की–"बाबासाहेब ने संविधान नहीं लिखा, बी. एन. राव ने संविधान लिखा" तसेच "बाबासाहब अंग्रेजों का दलाल और एजेंट था". यासोबत चंदनने "इस बात से १००% सहमत हूँ" असे कॅप्शनही लिहिले होते.

ही पोस्ट आयु. विकास गवई आणि आयु. मोहित लगाडे यांच्या निदर्शनास आली. त्यांनी चंदनशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर त्यांनी चंदनच्या बहिणीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण त्यातही यश आले नाही. विकास गवई स्वतः चंदन सिंगच्या राहत्या घरी गेले. त्यावेळी चंदन घरात स्वतःला कडी लावून बसला होता आणि बाहेर येण्यास नकार देत होता. त्यानंतर १०० नंबरवर संपर्क करून पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून चंदन सिंगला ताब्यात घेऊन चौकीत आणले.

या प्रकाराची माहिती तुर्भे विभागात पसरताच आंबेडकरी समाजामध्ये संतापाची लाट निर्माण झाली. मोठ्या संख्येने आंबेडकरी जनता तुर्भे MIDC पोलिस ठाण्यात जमा झाली. फिर्यादार म्हणून आयु. विकास गवई यांनी कुमार चंदन सिंगविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्यान्वये गुन्हा दाखल केला.


गुन्हा नोंदविताना ॲड. सिद्धार्थ हिरोडे (मुंबई उच्च न्यायालय), आयु. सुरुज वाकळे, सत्यशोधक मैत्री संघाचे अभ्यासक तसेच तुर्भे विभागातील महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

या कारवाईमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी अनादर करणाऱ्या विधानांवर कठोर भूमिका घेतली जात असल्याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला आहे. पुढील तपास तुर्भे MIDC पोलिस ठाण्यांतर्फे सुरू आहे.

## खंडाळे ग्रामपंचायतीचा धक्कादायक घोटाळा ; शासकीय जागेची परस्पर विक्री उघडकीस ?

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

रायगड जिल्ह्यात "हफ्ता राज" माजला आहे .प्रॉपर्टी कार्डवरील बनावट नोंदी, जागेवर नसलेली घरे आणि अधिकाऱ्यांची हातमिळवणी उघड! रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील खंडाळे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत शासकीय जागेची बनावट व्यवहारांद्वारे विक्री झाल्याचे धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. ग्रामपंचायत रस्ता बंद करून शासनाची जागा विकली गेल्याची गंभीर तक्रार संगमपाडा गावातील नागरिक महेश मनोहर पेडणेकर व ग्रामस्थांनी पंचायत समिती अलिबागकडे केली होती. चौकशीदरम्यान अनेक घरांच्या खोट्या नोंदी आणि अस्तित्वात नसलेली बांधकामे उघडकीस आली आहेत. शासनाच्या जागेवरच व्यवहार!चौकशीअंती स्पष्ट झाले की प्रॉपर्टी कार्ड क्र. 124 मधील शासनाची जमीन ग्रामसेवक आणि काही ग्रामपंचायत सदस्यांच्या संगनमताने विकण्यात आली.६ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या प्रत्यक्ष चौकशीत घर क्र. 116 ते 120 पर्यंतची पाचही घरे प्रत्यक्षात जागेवर आढळली नाहीत, मात्र ग्रामपंचायत नोंदींमध्ये त्यांची असेसमेंट करण्यात आली होती. या प्रकारातून स्पष्ट होते की ग्रामपंचायत दप्तरी खोटी घरे बसवून बनावट करनियम तयार करून व्यवहार रचला गेला. "दप्तरी घरे आहेत, पण जमिनीवर नाहीत!" ग्रामपंचायतीच्या अहवालानुसार खालील घरे नोंदीनुसार अस्तित्वात असूनही जागेवर सापडली नाहीत.घर क्र. 116 (400 चौ.मी.),घर क्र. 117 (400 चौ.मी.),घर क्र. 118 (900 चौ.मी.),घर क्र. 119 (625 चौ.मी.),घर क्र. 120 (864 चौ.मी.) तसेच घर क्र. 122, 124, 125 आणि 127 यांची नोंद आहे पण ही घरेही अस्तित्वात नाहीत.ही "भूतघरं" म्हणजेच भ्रष्टाचाराचं थेट पुरावा आहेत. अधिकारी, कर्मचारी आणि राजकीय संगनमत? ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, सिटी सर्व्हे अधिकारी व ग्रामसेवकांनी ठराविक लोकांच्या नावाने खोट्या घरपट्ट्या देऊन जागेचे पाच प्लॉट तयार केले."शासनाचे लक्ष नाही, वरचा हिस्सा ठरलेला आहे" या समजुतीतून अधिकाऱ्यांनी बिनधास्त व्यवहार केले. काही ग्रामसेवक तर उघडपणे म्हणतात "कोणाला कम्प्लेंट करा, आम्ही कोणाला घाबरत नाही! हप्ता वरपर्यंत जातो!"हा संवादच रायगड जिल्ह्यातील हफ्ता संस्कृतीचा आरसा आहे. गटविकास अधिकाऱ्यांचे आदेश,चौकशी अहवालाच्या आधारे गटविकास अधिकारी (नि. श्रे.) डी. एच. दाईगडे यांनी ग्रामपंचायत खंडाळे यांना शासनाच्या ३१ डिसेंबर २०१५ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.या आदेशामुळे आता संपूर्ण प्रकरणाला प्रशासकीय गती मिळण्याची शक्यता आहे.सामाजिक कार्यकर्त्यांची



मागणीअशी आहे की सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत म्हणाले की "अनेक ग्रामपंचायतींमध्ये एकाच जागेवर दोन नावे, तर काही ठिकाणी अस्तित्वात नसलेल्या घरांना असेसमेंट देण्याचे प्रकार सुरू आहेत.रायगड जिल्हा प्रशासन व ग्रामविकास विभागाने सर्व ग्रामपंचायतींचे ऑडिट करून जबाबदारांवर फौजदारी कारवाई करावी."रायगड जिल्ह्यात "पैसा बोले तो सिस्टम झुके!"रायगड जिल्ह्यात राजकीय पुढाऱ्यांचा वरदहस्त असलेले अधिकारी भ्रष्टाचारात आकंठ बुडालेत. एक घोटाळा बाहेर आला की दहा नवे सुरू होतात!शासकीय अधिकारी आणि कर्मचारी खुलेपणाने सांगतात "आमचं कोणी काही वाकडं करू शकत नाही."

हा भ्रष्टाचार आता प्रशासनाच्या डोक्यावरच बसला आहे!पंतप्रधान नरेंद्र मोदींचं घोषवाक्य हरवलं का?पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेलं वचन -"में नहीं खाऊंगा और किसी को खाने नहीं दूँगा"रायगड जिल्ह्यात अक्षरशः पायदळी तुडवलं गेलं आहे.

शासकीय यंत्रणा, ग्रामपंचायती आणि स्थानिक प्रशासनामध्ये भ्रष्टाचाराचा सुळसुळाट झाला आहे.जनतेचा विश्वास हरवत आहे आणि शासनाची प्रतिष्ठा धुळीस मिळते आहे.जबाबदार कोणअसा प्रश्न पडला आहे? जनतेचा रोष वाढत असून खालील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे आता जनतेचे लक्ष लागले आहे .मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार,गृहमंत्री देवेंद्र फडणवीस,ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे,ग्रामविकास सचिव एकनाथ डवले,रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे,रायगड जिल्हा परिषद मुख्याधिकारी नेहा भोसले,हे सर्वजण आता जनतेसमोर उत्तरदायी आहेत रायगडमध्ये भ्रष्टाचार थांबवण्यासाठी काही ठोस पावलं उचलणार का? जनतेचा सवाल ? "सरकारी जमिनी विकल्या जात असताना शासन झोपलंय का? ग्रामपंचायतीं मधील हफ्ता राज संपवायचा कोणाकडे धाडस आहे का?"

रायगड जिल्ह्यातील हा घोटाळा फक्त एक उदाहरण आहे ,पण ही ठिणगी संपूर्ण जिल्ह्याच्या भ्रष्ट कारभाराला धक्का देऊ शकते.

# फडके नाट्यगृहात विशेष सभेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका लवकरच जाहीर होणार आहेत. त्या अनुषंगाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व त्यामधील स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा आणि सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा निश्चित करावयाच्या आहेत. त्यासाठी सोमवार 13 ऑक्टोबर रोजी सकाळी 11 वाजता पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीतील रहिवाशांनी या सभेला हजर राहावे असे आवाहन पनवेलच्या तहसीलदार मीनल भामरे यांनी केले आहे.

# नियोजित फुलपाखरू उद्यानाचा भूमिपूजन समारंभ

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल चॅरिटेबल ट्रस्ट आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने नियोजित फुलपाखरू उद्यानाचा भूमिपूजन समारंभ 12 ऑक्टोबर रोजी सकाळी सव्वा दहा वाजता, महानगरपालिका गार्डन, साईनगर रोड, पनवेल येथे आणि पनवेल शहरातील विकसित रोटरी घनदाट जंगल प्रकल्प उरण रोड, पनवेल येथे तिसरा वर्धापन दिन सोहळा साजरा करण्यात येणार आहे. यावेळी उद्घाटक म्हणून माजी खासदार रामशेठ ठाकूर उपस्थित राहणार आहेत. यावेळी नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्रेसिडेंट अनिल ठकेकर, अतिश थोरात आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या सर्व सदस्यांनी केले आहे.

# के एल. ई. सोसायटीच्या सायन्स अँड कॉमर्स कॉलेज मध्ये विशेष मुलांच्या हस्तकला दिवाळी वस्तूचे प्रदर्शन व विक्री

**दैनिक युवक आधार**
**कळंबोली प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** डॉ. एन. एम. जाधव फाउंडेशन, नवीन पनवेल यांच्या वतीने आणि यूथ रेड क्रॉस विंग असोसिएशनच्या सहकार्याने, के. एल. ई. सोसायटीच्या सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, कळंबोली येथे विशेष मुलांनी तयार केलेल्या तोरणे,पणत्या,उटणे अशा दिवाळी सजावटीच्या वस्तूंचा प्रदर्शनीय विक्रीमेळा आयोजित करण्यात आला.



या उपक्रमामागचा उद्देश म्हणजे विशेष मुलांच्या कलागुणांना वाव देणे आणि त्यांना समाजात समाविष्ट करून त्यांचे मनोबल वाढवणे हा होता.

या मुलांनी स्वतः तयार केलेल्या आकर्षक तोरण, पणत्या, कंदील आणि इतर हस्तनिर्मित सजावटीच्या वस्तू विक्रीस ठेवण्यात आल्या होत्या.

कॉलेजमधील विद्यार्थी, प्राध्यापक तसेच परिसरातील नागरिकांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि मुलांनी बनवलेल्या वस्तूंना भरभरून प्रतिसाद दिला. अनेक वस्तू काही वेळातच विकल्या गेल्या, हे विशेष मुलांच्या कौशल्याला मिळालेल्या सामाजिक स्वीकाराचे द्योतक होते.

कॉलेजचे *प्राचार्य प्रा. (डॉ.) विजय डी. मेंढूळकर यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले, " अशा उपक्रमांमुळे समाजात जागरूकता आणि सहानुभूती निर्माण होते आणि विशेष मुलांना आपणही समाजाचा एक भाग असल्याची जाणीव होते."

समन्वयक प्रा. (डॉ.) शशिकला प्रजापती यांनी संस्थेच्या व्यवस्थापन व प्राचार्यांचे आभार मानले की, अशा विधायक उपक्रमांसाठी त्यांनी महाविद्यालयात नेहमीच सहकार्य केले आहे.

श्रीमती स्वाती माने आणि श्री. संतोष शिवदास आमले यांनी या संपूर्ण उपक्रमात विशेष मुलांना साथ दिली आणि विद्यार्थ्यांची मुलांप्रमाणे प्रेम व काळजी घेतली. त्यांच्या सेवाभावामुळे संपूर्ण कार्यक्रम अधिक सुसंवेदनशील आणि प्रेरणादायी ठरला.

डॉ . एन. एम. जाधव फाउंडेशनने महाविद्यालय आणि रेड क्रॉस विंगचे आभार मानले आणि भविष्यातही असेच उपक्रम राबवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# सीकेटी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची एनआयएसएमला शैक्षणिक भेट; शार्क टँक स्पर्धेत चमकदार कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलच्या वतीने पाताळगंगा रसायनी मधील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्सला (एनआयएसएम) शैक्षणिक भेट देण्यात आली.




वर्ल्ड इन्व्हेस्टर वीक २०२५ च्या निमित्ताने नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्स (एनआयएसएम) यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी एक माहितीपूर्ण शैक्षणिक सहल आयोजित केली होती. या कार्यक्रमाचा उद्देश आर्थिक साक्षरता, सायबर फसवणूक प्रतिबंध आणि गुंतवणूकदार संरक्षण यासंदर्भात तरुणांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा होता. बी.एस्सी. इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग आणि बी.एस्सी. इन सायबरसिक्युरिटी अँड डिजिटल फॉरेन्सिक या अभ्यासक्रमातील एकूण १०२ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

दिवसाची सुरुवात बी.एस.ई. च्या मुख्य नियामक अधिकारी कमला कंठराज यांच्या अभ्यासपूर्ण तज्ञ उद्योग सत्राने झाली. त्यांनी नैतिक बाजार व्यवहार आणि नियामक अनुपालनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यानंतर सायबर फसवणूक प्रतिबंध आणि जबाबदारीपूर्ण डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरावर आधारित एक प्रभावी नाट्यप्रयोग सादर करण्यात आला. दिवसातील मुख्य आकर्षण होते एनआयएसएम शार्क टँक स्पर्धा, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या उद्योजकीय आणि तांत्रिक कौशल्यांचे प्रदर्शन केले. सहभागी पाच महाविद्यालयांपैकी सी. के. टी. कॉलेजच्या टीमने त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनेच्या कार्यरत प्रोटोटाइपसाठी विशेष उल्लेख मिळवला. या टीममध्ये अंकित शर्मा, प्रेम मोकाशी, निलजा मुंढे आणि विधी म्हात्रे (प्रथम वर्ष, बी.एस्सी. सायबरसिक्युरिटी अँड डिजिटल फॉरेन्सिक) यांचा समावेश होता. त्यांनी "इनव्हॉईसी प्रो" हे स्मार्ट, वेब-आधारित जीएसटी बिलिंग प्लॅटफॉर्म सादर केले. हे सोल्युशन लघु व्यावसायिक आणि फ्रीलान्सर यांच्यासाठी अनुपालन व स्वयंचलन सुलभ करण्याचे उद्दिष्ट बाळगते. हे दर्शवते की विद्यार्थी कसे त्यांच्या वर्गातील शिक्षणाचा वापर करून असंघटित क्षेत्रातील प्रत्यक्ष आर्थिक अडचणी सोडवण्यासाठी उपाय शोधत आहेत.

या शैक्षणिक सहलीमुळे विद्यार्थ्यांना डिजिटल फायनान्स, सायबरसिक्युरिटीचे उपयोग, आणि सिक्युरिटीज मार्केटमधील नियामक प्रणाली यांचे महत्त्वपूर्ण ज्ञान मिळाले. ही भेट शैक्षणिक ज्ञान आणि उद्योग व्यवहार यांच्यातील दुवा मजबूत आणि शिक्षण व उद्योग-संलग्न शिक्षण या बांधिलकीस अधोरेखित करणारी ठरली. शैक्षणिक सहलीचे आयोजन प्लेसमेंट सेलचे अध्यक्ष प्रा. सत्यजीत कांबळे, प्रशिक्षण व रोजगार अधिकारी आरती कागवाडे, समीर कांबळे (कोर्स कोऑर्डिनेटर), संध्या जवळे, श्रुती कोळी, श्री. आदित्य येवले आणि कौस्तुभ सोमण यांनी पार पडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. प्रस्तुत कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के.पाटील यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

# मालेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांवर अन्याय!

## शिवसेना (उ.बा.ठा) कार्यकर्त्यांनी 'भिक मागून' सरकारला दिली मदत—ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी



**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

**मालेगाव :** तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन,तुर आणि इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असतानाही मालेगाव तालुक्याचा समावेश शासनाच्या नुकत्याच जाहीर झालेल्या अतिवृष्टी बाधित तालुक्यांच्या यादीत करण्यात आलेला नाही. यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे या अन्यायाविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) तर्फे आगळावेगळा निषेध नोंदविण्यात आला.पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मालेगाव शहरात "भिक मागून" मुख्यमंत्री सहायता निधीसाठी 961रु रक्कम गोळा करून ती तहसीलदारांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात आली. शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव पाटील गोडे, शिवसेना (उबाठा) तालुका समन्वयक भगवान बोरकर, तालुका संघटक गजानन बोरचाटे, उपतालुकाप्रमुख विजय शेंडगे सर्कल प्रमुख गजाननराव गवळी (डोंगरकिन्ही),वसंतराव आंधळे,प्रशांत लोखंडे,गजानन ठाकुर,गणेश सरनाईक,आशिष डाहाळे आदींच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यकर्त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,शासनाने ९ ऑक्टोबर रोजी जाहीर केलेल्या विशेष पॅकेजमधून मालेगाव तालुक्याला वगळल्याने शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे.अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत आणि संपूर्ण कर्जमाफी जाहीर करावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनाची प्रत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनाही पाठविण्यात आली आहे.

# बोकडवीरा गावचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा कबड्डीचे उत्कृष्ट समालोचक रा. स. पाटील गुरुजींचे यांचे दुःखद निधन

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

बोकडवीरा गावचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि माजी प्राथमिक शिक्षक रा. स. पाटील गुरुजी (वय 83) यांचे रविवारी दि. 5 ऑक्टोबर रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने उरण तालुक्यातील सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.



रा. स. पाटील गुरुजी हे उरणमधील सर्वपरिचित व्यक्तिमत्व होते. ते उत्कृष्ट निवेदक, कबड्डी समालोचक, बुद्धिबळपटू, नाट्यदिग्दर्शक म्हणून प्रसिद्ध होते.1984 च्या उरण शेतकरी आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवून त्यांनी शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून लौकिक मिळवला होता. उरण सेवा निवृत्त ज्येष्ठ नागरिक संस्था, गणेश क्लब बोकडवीरा, गणेश नाट्य मंडळ गणेशपूर, गणेश लेझीम पथक बोकडवीरा, ग्रामस्थ मंडळ बोकडवीरा आणि गणपती देवस्थान ट्रस्ट बोकडवीरा या नामवंत संस्थांमध्ये त्यांनी जबाबदारीने कार्य केलेआहे

गणेश क्लबच्या पटांगणात त्यांनी वर्षानुवर्षे कबड्डीचे उत्कृष्ट समालोचन करून अनेक क्रीडापटूंना प्रेरणा दिली. त्यांच्या प्रभावी आवाजामुळे आणि प्रगल्भ निवेदन शैलीमुळे ते जिल्ह्या बाहेरही प्रसिद्ध निवेदक म्हणून ओळखले जात होते. आपल्या शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असताना त्यानी अनेक विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन केले. शिक्षक म्हणून त्यांनी खोपटे, जसखार, मुळेखंड, डोंगरी, पाणजे, मुर्बी, चिखले, न्हावे खाडी आदी ठिकाणी कार्य केले. त्यांच्या निधनाने उरण तालुक्यातील सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

रा. स. पाटील गुरुजी हे रायगड जिल्ह्यातील परिचित सामाजिक कार्यकर्ते आणि बुद्धिबळपटू संदीप पाटील यांचे वडील होत त्यांच्यावर बोकडविरा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, शिक्षक, पत्रकार व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

# विज्ञान... नवकल्पना... आणि प्रगतीचा नवा अध्याय सुरू होतोय. सेलू नगरीत उभारले जात आहे एक आधुनिक विज्ञान केंद्र

**दैनिक युवक आधार सेलू**
**तालुका प्रतिनिधी (ग्रामीण) :विठ्ठल राऊत**

'क्युरिऑसिटी सायन्स अँड इनोव्हेशन ॲक्टिव्हिटी सेंटर!

राजीव गांधी आयोगांतर्गत नेहरू सायन्स सेंटर आणि श्रीराम प्रतिष्ठान, सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने 'क्युरिऑसिटी सायन्स अँड इनोव्हेशन ॲक्टिव्हिटी सेंटर!या अत्याधुनिक विज्ञान केंद्राचा भूमिपूजन सोहळा शनिवार,११ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० वाजून ३० मिनिटांनी आयोजित करण्यात आला आहे."

या ऐतिहासिक सोहळ्यास मा. डॉ. अनिल काकोडकर, अनुशास्त्रज्ञ, अध्यक्ष, राजीव गांधी विज्ञान तंत्रज्ञान कमिशन, महाराष्ट्र राज्य. माजी अध्यक्ष भारतीय अणुऊर्जा मंडळ तथा अणुऊर्जा विभाग अधिकारी, भारत सरकार., श्री रवींद्र सिंग परदेशी भा.पो.से. पोलीस निरीक्षक परभणी, श्री. दिनेश जगताप, वैज्ञानिक राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान कमिशन महाराष्ट्र राज्य, सौ. भावनाताई बोर्डीकर चेअरमन श्री. तुळजाभवानी शुगर प्रा. लि. माननीय जलील शेख, उपसंचालक इतर मागास बहुजन कल्याण विभाग, श्री शैलेश लाहोटी, उपविभागीय अधिकारी, सेलू, डॉ. सदानंद भिसे अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय परभणी, रामेश्वर मुंडे सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण विभाग परभणी., तो सविता बिर्गे शिक्षणाधिकारी मा. जि.प.परभणी. श्री सुनील पोलास शिक्षणाधिकारी प्रा. जि. प. परभणी, श्री गोविंद मोरे उपशिक्षणाधिकारी मा. जि. प. परभणी, श्री. मनोज चव्हाण, उपशिक्षणाधिकारी मा.जि.प. परभणी. यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

"क्युरिऑसिटी सायन्स सेंटरमध्ये विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक प्रयोगशाळा, इनोव्हेशन हब,स्विमिंग पूल आणि इनडोअर स्टेडियम अशा आधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत.""विज्ञान प्रयोग स्पर्धा, प्रश्नमंजुषा आणि विविध प्रदर्शनांमधून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला नवी दिशा मिळणार आहे.ज्ञानतीर्थ विद्यार्थ्यांपासून"'विज्ञान यात्रेला सूरूवात वैज्ञानिक पथकाची परेड सकाळी ८.३० वाजता, आणि खास शिक्षकांसाठी प्रेरणादायी 'विज्ञान चर्चासत्र' दुपारी ३ वाजता डॉ. अनिल काकोडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात येणार आहे.

"मग चला, या ऐतिहासिक विज्ञान महोत्सवाचा साक्षीदार व्हा...११ ऑक्टोबर २०२५, सकाळी १०.३० वाजता,सॅनरो नॉलेज सिटी, रवळगाव रोड, सेलू, जिल्हा परभणी येथेनक्की उपस्थित राहा!तरी सेलूतील नागरीक, विद्यार्थ्यांनी या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित रहावे असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक असलेले श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा सेलू कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉ. संजय रोडगे यांनी केले आहे.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# “वाढवण–जेएनपीए बंदरं देशाचं आर्थिक हृदय ठरणार!” – उन्मेष वाघ

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

जेएनपीए बंदर हे आज देशाच्या आर्थिक प्रगतीचे हृदय आहे आणि वाढवण बंदर त्या हृदयाचा दुसरा ठोका ठरणार आहे, असे प्रतिपादन जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेष शरद वाघ यांनी केले. जेएनपीए कामगार एकता संघटनेच्या वार्षिक कामगार मेळाव्यात ते बोलत होते. या मेळाव्याचे आयोजन कामगार एकता संघटनेचे विश्वस्त दिनेश पाटील यांनी केले होते. या कार्यक्रमात हास्यप्रबोधनकार संजीवन म्हात्रे यांनी उन्मेष वाघ यांची खास मुलाखत घेतली.

वाघ म्हणाले की, जेएनपीए बंदराची गेल्या काही वर्षांतील प्रगती पाहता हे बंदर देशाच्या आर्थिक कणा बनले आहे. वाढवण बंदरही त्याच धर्तीवर विकसित होत असून ही दोन्ही बंदरे देशाच्या विकासाच्या गतीला नवी दिशा देणार आहेत. वाढवण बंदराला सुरुवातीला विरोध करणारे स्थानिक आता त्याच प्रकल्पाचे स्वागत करत आहेत. आम्ही त्यांच्या मनातील शंका दूर केल्या, विकासाची प्रत्यक्ष उदाहरणे दाखवली आणि स्थानिकांचा विश्वास संपादन केला. हनुमान कोळीवाडा प्रश्न वगळता उर्वरित सर्व प्रलंबित प्रश्न सोडवण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. स्थानिक भूमिपुत्रांचा त्याग आम्हाला नेहमीच प्रेरणा देतो.



वाघ पुढे म्हणाले की, वाढवण भागातील सुमारे पंधरा हजार नागरिकांना आम्ही जेएनपीए बंदर परिसरात आणून बंदर विकासाचे प्रत्यक्ष दर्शन घडवले. या भेटीमुळे वाढवण प्रकल्पाला आता स्थानिकांचे मोठ्या प्रमाणात समर्थन लाभत आहे. जगातील उत्कृष्ट बंदरांमध्ये जेएनपीएचा समावेश झाला आहे. जागतिक बँकेकडून उत्कृष्टतेचे प्रमाणपत्र मिळाल्यामुळे जेएनपीएचा क्रमांक जगात97 वरून थेट 23वर पोहोचला आहे. मुंबई बंदरानंतर जेएनपीए आणि आता वाढवण बंदर या विकास साखळीतील महत्त्वाचे टप्पे आहेत. या माध्यमातून देशाच्या आर्थिक भविष्यास आकार देण्याचे कार्य सुरू आहे.

वाढवण बंदर हे जेएनपीएच्या तीनपट मोठे असून या प्रकल्पासाठी तब्बल 76,220 कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. सात ते आठ किलोमीटर समुद्रातच हे बंदर उभारण्यात येणार असून एकाही गावाचे विस्थापन होणार नाही. कोणतेही घर उद्ध्वस्त न करता विकासाची वाट मोकळी करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे सुमारे बारा लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील. जेएनपीएतील निवृत्त कामगारांना पेन्शन आणि वैद्यकीय सुविधांचा संपूर्ण लाभ मिळेल, अशी खात्री वाघ यांनी दिली. “मी सुद्धा एक दिवस निवृत्त होणारच आहे, त्यामुळे कामगारांच्या हिताची काळजी घेणे हीच माझी जबाबदारी आहे,” असेही ते हसत म्हणाले.

कर्मचाऱ्यांच्या आणि स्थानिक नागरिकांच्या मुला-मुलींना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी सीबीएसई शाळेचे काम सुरू आहे. तसेच स्थानिक क्रिकेटपटूंना प्रशिक्षण देण्यासाठी केंद्र उभारले जात आहे.

बंदर परिसरातील मूलभूत सुविधा उंचावण्यासाठी मोठे प्रयत्न सुरू आहेत. पुढील दोन वर्षांत परिसरात नागरिकांना फिरण्यासाठी पाच नवी ठिकाणे तयार होतील. जुना शेवा गावातील शिवमंदिरासाठी त्र्यंबकेश्वरची प्रतिकृती उभारली जात आहे. परिसरातील कचरा व्यवस्थापन आणि रस्ते स्वच्छतेसाठी 2 ऑक्टोबरपासून व्हॅक्यूम क्लीनिंग यंत्रणा सुरू झाली आहे. स्थानिक युवकांना औद्योगिक क्षेत्रातील नोकऱ्यांसाठी प्रशिक्षण देण्यात येत आहे.

वाघ यांनी या निमित्ताने स्पष्ट सांगितले की, “आमचा उद्देश संघर्ष नव्हे, सहकार्य आहे. स्थानिकांचा सन्मान राखत, त्यांच्या हक्कांना न्याय देत विकास करायचा आहे. जेएनपीए आणि वाढवण बंदर ही देशाच्या आर्थिक हृदयाची दोन ठोके ठरणार आहेत.” या कार्यक्रमास वरिष्ठ प्रबंधक मनीषा जाधव, ॲड. जयप्रकाश सावंत, बोरवणकर, संजीवन म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

गायिका कडू-खरात आणि गायक राजरत्न यांच्या पथकाने स्फूर्ती गीते सादर करत कार्यक्रमाला रंगत आणली.

## सीड्स अँड फर्टीलायझर्स असोसिएशन कडून मुख्यमंत्री सहायता निधीत 82 हजार 200 चा निधी जमा....

### हिमायतनगर येथील कृषी दुकानदारांकडून पूरग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत..



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी/माधव काईतवाड बोरगडीकर**

**हिमायतनगर** - तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मागील काळात झालेल्या अतिवृष्टी मध्ये अतोनात नुकसान झाले आहे त्यामध्ये शेतकऱ्यांच्या पिकांची प्रचंड हानी होऊन सणासुदीच्या दिवसात त्यांच्यावर मोठे संकट कोसळले आहे त्यामुळे हिमायतनगर शहरातील व तालुका सीड्स फर्टिलायझर्स अँड पेस्टिसाइड डीलर्स असोसिएशन या संघटनेकडून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तुमच्या मुख्यमंत्री आर्थिक सहायता निधीमध्ये 82 हजार दोनशे रुपयाची आर्थिक रक्कम जमा करून त्याचा चेक हिमायतनगर येथील तहसीलदार पल्लवी टेमकर यांच्यामार्फत महाराष्ट्र सरकारला देण्यात आला आहे....

याबाबत सविस्तर वृत्त असे की हिमायतनगर तालुका सीड्स फर्टीलायझर्स अँड पेस्टिसाइड डीलर्स असोसिएशन या संघटने कडून जिल्ह्यात झालेल्या पूर परिस्थितीमध्ये अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाल्यामुळे त्यांना एक मायेचा आधार व आर्थिक स्वरूपात मदत करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मोठी भूमिका घेतली त्या भूमिकेचे हिमायतनगर येथील कृषी दुकानदारांनी स्वागत करून मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये 82 हजार दोनशे रुपयांचा थेट निधी जमा करून हिमायतनगर येथील तहसीलदार पल्लवी टेमकर यांच्या मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आज तो दिला आहे यावेळी तालुका सीड्स अँड फर्टिलायझर्स संघटनेचे तालुका अध्यक्ष रमेश पळशीकर, उपाध्यक्ष मारोती लुम्दे,श्यामसुंदर ढगे, अ.कलीम,रामेश्वर पाकलवाड, गणेश पाळजकर, रवींद्र दमकोडवार,राजदत्त सूर्यवंशी सह आदी कृषी दुकानदार मोठ्या संख्येने उपस्थित होते

## ई-बस प्रवाशांसाठी एसटीकडून मासिक व त्रैमासिक पास योजना सुरु - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक




**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी महामंडळाने) प्रवाशांच्या सोयीसाठी आणि ई-बस सेवेला अधिक प्रतिसाद मिळवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता राज्यातील ई-बस प्रवाशांना मासिक व त्रैमासिक पास सवलत योजना उपलब्ध होणार आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष श्री प्रताप सरनाईक यांनी दिली.मंत्री सरनाईक म्हणाले की या पास योजनांचा मुख्य उद्देश नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने दररोज एकाच मार्गावर प्रवास करणाऱ्या नियमित प्रवाशांना ई-बस सेवेकडे आकर्षित करणे हा आहे. सध्या महामंडळाच्या ताफ्यात ई-बस प्रकल्पातील ४४८ बस आणि शिवाई प्रकल्पातील ५० ई-बसेस कार्यरत आहेत. भविष्यात या बसेसची संख्या आणखी वाढवण्याचा मानस आहे.अनेक प्रवाशांकडून ई-बस सेवेत पास प्रणालीची मागणी केली जात होती. या पार्श्वभूमीवर महामंडळाने प्रवाशांना अधिक सोयीस्कर आणि आर्थिकदृष्ट्या परवडणारा प्रवास देण्यासाठी ही योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम**
**नविन प्रशासकीय इमारत, काटा रोड, वाशिम - ४४४५०५**
**ग्रामपंचायत निवडणूक विभाग**
**जाहीर प्रकटन**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील तरतुदीनुसार व महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम, २०२५ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रात सभा घेऊन अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती/ नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा आणि सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा निश्चित करावयाच्या आहेत. त्याकरिता सोडत पध्दतीने कार्यवाही करण्याकरिता खाली दर्शविल्याप्रमाणे विशेष सभा आयोजित केली आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव /पंचायत समितीचे नाव | सभेचे ठिकाण | सभेची वेळ व तारीख |
|---|---|---|---|
| ०१ | जिल्हा परिषद, वाशिम | जिल्हा नियोजन भवन सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम | दिनांक १३.१०.२०२५ वेळ :- दुपारी ०१.०० वा. |
| ०१ | पंचायत समिती, कारंजा | पंचायत समिती सभागृह, कारंजा | दिनांक १३.१०.२०२५ वेळ :- सकाळी ११.०० वा. |
| ०२ | पंचायत समिती, मानोरा | तहसिल कार्यालय, मानोरा | दिनांक १३.१०.२०२५ वेळ :- दुपारी ०३.०० वा. |
| ०३ | पंचायत समिती, मंगरुळपीर | पंचायत समिती सभागृह, मंगरुळपीर | दिनांक १३.१०.२०२५ वेळ :- दुपारी ०३.०० वा. |
| ०४ | पंचायत समिती, मालेगांव | तहसिल कार्यालय, मालेगांव | दिनांक १३.१०.२०२५ वेळ :- सकाळी ११.०० वा. |
| ०५ | पंचायत समिती, रिसोड | तहसिल कार्यालय, रिसोड | दिनांक १३.१०.२०२५ वेळ :- सकाळी ११.०० वा. |
| ०६ | पंचायत समिती, , वाशिम | तहसिल कार्यालय, वाशिम | दिनांक १३.१०.२०२५ वेळ :- दुपारी ०३.०० वा. |

जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीतील ज्या रहिवाशांची सदर सभेस हजर राहण्याची इच्छा आहे, त्यांनी वरील ठिकाणी व वेळी हजर राहावे.
जिल्हा :- वाशिम
दिनांक :- १०.१०.२०२५

**( योगेश कुंभेजकर भा.प्र.से)**
**जिल्हाधिकारी. वाशिम**

**जि.मा.का./अब./जाहि./५६२/२०२५-२६**

## सोयगाव येथे खा. कल्याणराव काळे यांची तहसील कार्यालय मध्ये आढावा बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव** :- जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.कल्याण काळे यांच्या अध्यक्षतेखाली सोयगाव तहसील कार्यालयात गुरुवारी तालुका स्तरीय आढावा बैठक पार पडली.या बैठकीत ग्रामीण भागातील शेतकरी आणि ग्रामस्थांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करत तक्रारींचा अक्षरशः पाढा वाचला.या बैठकीत ग्रामस्थांनी सांगितले की,अनेक शासकीय अधिकारी मुख्यालयी अनुपस्थित राहतात आणि जिल्हा मुख्यालयातूनच ये-जा करतात. कार्यालयात उशिरा येणे आणि दुपारच्या सुमारास लवकर निघणे हे नेहमीचेच झाले आहे.परिणामी,अतिवृष्टीच्या कालावधीत शेतकऱ्यांची महत्त्वाची कामे खोळंबली आहेत.ग्रामपंचायतींतून प्राप्त झालेल्या तक्रारींमध्ये घरकुल,गाय गोठा, सिंचन विहीर योजना,पांदन रस्ते, बैलगाडी वाट,सार्वजनिक रस्ते,पूल, पिण्याचे पाणी आणि एस.टी.बस सेवेची दुरवस्था यांचा समावेश होता.



**------विशेष बाब:---**

आजवर तहसील कार्यालयात विविध मोर्चे आणि निवेदने देण्यात आली,परंतु तहसीलदार कधीच दिसल्या नाहीत.मात्र खासदार साहेबांच्या आगमनामुळे तहसीलदार मनीषा मेणे-जोगदंड यांची उपस्थिती लक्षणीय ठरली. यावरून तालुक्यातील शेतकरी वर्गात आश्चर्य व्यक्त केले जात असून,बैठकीनंतर या विषयावरही चर्चेला उधाण आले.

**खा. काळेंचा शासनावर हल्लाबोल**

राज्य सरकारने शेतकऱ्यांना केवळ दिखाऊ मदत जाहीर केली आहे. खरंतर संपूर्ण कर्जमाफीची गरज होती, पण सरकारने अतीअल्प मदतीद्वारे शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत," अशी तीव्र प्रतिक्रिया खासदार डॉ. कल्याण काळे यांनी बैठकीदरम्यान दिली. उपस्थित मान्यवर:या बैठकीस सोयगाव तालुका काँग्रेस अध्यक्ष राजेंद्र काळे, शिवसेना (उबाठा) तालुका प्रमुख दिलीप मचे, राष्ट्रवादी (शरद पवार) तालुका अध्यक्ष इंद्रसिंह सोळुंके, दिनेशासिंह हजारी,रवींद्र काळे,कृष्णा जूनघरे पाटील,लखुसिंग नाईक,प्रमोद रावणे,भारत पगारे आणि डॉ.रघुनाथ फुसे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# मुदखेड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५

## प्रभागनिहाय आरक्षण जाहीर - महिलांना मोठी संधी, अनुसूचित जाती-जमातींनाही प्रतिनिधित्व

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड (प्रतिनिधी): प्रतिनिधी योगेश चौदंते**

मुदखेड नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सन २०२५ मध्ये प्रभागनिहाय आरक्षण यादी जाहीर करण्यात आली आहे. नगर परिषदेअंतर्गत एकूण १० प्रभागांमध्ये विविध वर्गानुसार जागांचे आरक्षण निश्चित करण्यात आले असून, महिलांना तसेच अनुसूचित जाती-जमाती व नागरी समाजातील उमेदवारांना न्याय देणारे हे आरक्षण असल्याचे नागरिकांतून मत व्यक्त होत आहे.




या यादीमुळे मुदखेड शहरात निवडणुकीचे वातावरण रंग घेऊ लागले आहे. संभाव्य उमेदवारांची धावपळ सुरू झाली असून, प्रत्येक प्रभागात चर्चेचा विषय ठरले आहे की कोणत्या पक्षाकडून कोण उमेदवार होणार?

नगरपरिषदेमध्ये सामाजिक समतोल राखण्यासाठी आणि सर्व घटकांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी हे आरक्षण लागू करण्यात आले असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**प्रभागनिहाय जागांचा तपशील पुढीलप्रमाणे :**

**अ.क्र. प्रभाग क्र. जागा क्र. आरक्षणाचा तपशील**

1 प्रभाग क्र. 1 1 अ अनुसूचित जमाती (महिला)

1 ब सर्वसाधारण

2 प्रभाग क्र. 2 2 अ अनुसूचित जाती

2 ब सर्वसाधारण (महिला)

3 प्रभाग क्र. 3 3 अ ना.मा.प्र. (महिला)

3 व सर्वसाधारण

4 प्रभाग क्र. 4 4 अ अनुसूचित जाती (महिला)

4 ब सर्वसाधारण

5 प्रभाग क्र. 5 5 अ ना.मा.प्र. (महिला)

5 ब सर्वसाधारण

6 प्रभाग क्र. 6 6 अ ना.मा.प्र. (महिला)

6 ब सर्वसाधारण

7 प्रभाग क्र. 7 7 अ अनुसूचित जाती (महिला)

7 व सर्वसाधारण

8 प्रभाग क्र. 8 8 अ ना.मा.प्र.

8 व सर्वसाधारण (महिला)

9 प्रभाग क्र. 9 9 अ सर्वसाधारण (महिला)

9 ब सर्वसाधारण

10 प्रभाग क्र. 10 10 अ ना.मा.प्र.

10 व सर्वसाधारण (महिला)

**महिलांचे वर्चस्व**

या आरक्षणात महिलांना विशेष प्राधान्य देण्यात आले असून, बहुतांश प्रभागांमध्ये किमान एक जागा महिला वर्गासाठी राखीव आहे. त्यामुळे मुदखेड नगरपरिषदेच्या पुढील कार्यकाळात महिलांचे प्रतिनिधित्व मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे.

**सामाजिक न्यायाची दिशा**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींचे प्रतिनिधित्व राखण्यासाठीही काही प्रभाग राखीव करण्यात आले आहेत. त्यामुळे समाजातील सर्व घटकांना स्थानिक स्वराज्यात सहभाग घेण्याची समान संधी मिळणार आहे.

**निवडणुकीचा कौल कोणाकडे?**

आरक्षण यादी जाहीर होताच मुदखेड शहरातील राजकीय वातावरणात चैतन्य निर्माण झाले आहे. संभाव्य उमेदवारांनी मतदारसंघात आपले संपर्क वाढवण्यास सुरुवात केली असून, पक्षीय समीकरणांमध्ये नवे बदल दिसू लागले आहेत.

**मुख्याधिकारी, नगर परिषद मुदखेड**

यांनी जारी केलेल्या अधिकृत यादीनुसारच आगामी निवडणूक पार पडणार असून, लवकरच निवडणुकीचा कार्यक्रमही जाहीर होण्याची शक्यता आहे.

## परतूरचे डी.वाय.एस.पी.रामेश्वर रेंगे यांनी महाराष्ट्रातील सर्वात कठीण एएमके ट्रेक १४ तासांत केले पूर्ण

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके)**

कायदा-सुव्यवस्थेच्या कामात व्यस्त असतानाही आपले शारीरिक आणि मानसिक आरोग्य कसे जपावे, याचा आदर्श वस्तुपाठ उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांनी घालून दिला आहे. रेंगे यांनी सायकलिंग आणि ट्रेकिंगच्या साहसी छंदांला कुटुंबाची साथ मिळाल्याने फिटनेसची एक नवी ओळख निर्माण केली आहे.कोरोना काळात परतूरचे डीवायएसपी रामेश्वर रेंगे यांनी सायकलिंगला सुरुवात केली. विशेष म्हणजे, त्यांच्या या छंदाला त्यांचा मुलगा अभिजीत आणि मुलगी अदिती यांनीही साथ दिली. ते रोज साधारणपणे 30 ते 50 किलोमीटर सायकलिंग करतात, तसेच अनेकदा एकाच वेळी 100 किलोमीटर सायकलिंगचा टप्पाही सहज पार करतात. यामुळे त्यांच्या कुटुंबात फिटनेसची एक आरोग्यदायी सवय लागली आहे.सह्याद्रीतील सर्वात अवघड ट्रेक्सवर 'रेंगे' यांचा विजय सायकलिंगसोबतच रेंगे यांना ट्रेकिंगची




प्रचंड आवड आहे. महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये अनेक कठीण आणि ऐतिहासिक किल्ले त्यांनी सर केले आहेत.महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर असलेल्या कळसुबाईवर त्यांनी आतापर्यंत तब्बल दहा वेळा चढाई केली आहे. ऐतिहासिक किल्ले रतनगड आणि हरिहर गड प्रत्येकी चार वेळा तसेच राजगड, हरिश्चंद्र गड, शिवनेरी किल्ला त्यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केले आहेत. पुण्याच्या परिसरातील सर्वात कठीण मानला जाणारा कात्रज बोगदा ते सिंहगड नाईट ट्रेक त्यांनी पूर्ण केला, ज्यात सलग सतरा डोंगरांचा चढ-उतार असतो.रामेश्वर रेंगे यांच्या ट्रेकिंगमधील सर्वात मोठी आणि रोमांचक कामगिरी म्हणजे अलंग, मदन, कुलंग या दुर्ग त्रिकुटाचा ट्रेक. सह्याद्रीतील अत्यंत कठीण आणि एका दिवसात पूर्ण करणे जवळपास अशक्य मानला जाणारा एएमकेचा थरार ट्रेक त्यांनी केवळ 14 तासात पूर्ण केला आहे. या ट्रेकमध्ये रॅपलिंग आणि क्लाइंबिंग यांसारखी आवश्यक कौशल्ये वापरून त्यांनी स्वतःची शारीरिक आणि मानसिक क्षमता सिद्ध केली आहे.महाराष्ट्रातील आव्हानं पार केल्यानंतर त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपला साहसी प्रवास सुरू ठेवला. नोव्हेंबर 2023 मध्ये त्यांनी नेपाळमधील जगातील सर्वोच्च शिखर असलेल्या माउंट एव्हरेस्टचा बेस कॅम्प यशस्वीरित्या पूर्ण केला. त्यानंतर डिसेंबर 2024 मध्ये त्यांनी उत्तराखंडमधील निसर्गरम्य आणि आव्हानात्मक केदारकंठा ट्रेक पूर्ण केला आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांची ही कामगिरी केवळ एक छंद नसून, आपल्या व्यस्त जीवनातही शारीरिक क्षमता आणि मानसिक कणखरता कशी जपायची, याचा एक प्रेरणादायी संदेश आहे. पोलीस दलातील कर्तव्ये आणि साहसी छंदांचा योग्य समन्वय साधून त्यांनी एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

## अतिवृष्टीच्या पुरामध्ये बांधीत झालेल्या यादीतून नांदेड जिल्हा वगळला

### पूरग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड प्रतिनिधी योगेश चौदंते**

राज्य सरकारने काल अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित जिल्ह्यांची अधिकृत यादी जाहीर केली. मात्र या यादीत नांदेड जिल्ह्याचे नावच समाविष्ट नसल्याने शेतकरी वर्गात तीव्र संताप उसळला आहे. गेल्या दोन महिन्यांत नांदेड जिल्ह्यातील शेकडो गावे पुराच्या विळख्यात अडकली, पिकांचे प्रचंड नुकसान झाले, शेतकरी उद्ध्वस्त झाले असतानाही सरकारी यादीत नावे नसणे गंभीर शंका निर्माण करणारे आहे.

अतिवृष्टीने सर्वाधिक हानीग्रस्त जिल्ह्यांमध्ये नांदेड – तरीही नाव गायब!

गोदावरी, पूर्णा, माणार व पेंगंगा नदीकाठच्या गावी पुरस्थिती निर्माण होऊन मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले. सोयाबीन, कापूस, तूर, मका, बाजरी यांसारखी पिके पूर्णपणे पाण्याखाली गेली. हजारो शेतकऱ्यांचे हंगामाचे भविष्य उद्ध्वस्त झाले.

यावरही नांदेड जिल्ह्याला सरकारी मदत आणि ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या यादीतून वगळण्यात आले आहे.

**जाणूनबुजून वगळले की प्रशासनाची घोर बेपर्वाई?**

यादीतून नांदेडचे नाव वगळण्यामागे कोणताही अधिकृत खुलासा न होताच लोकांमध्ये प्रश्न उभा राहिला आहे–

पंचनामे झाले तर मग जिल्ह्याला हक्काची मदत का नाही?

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अहवाल उशिरा पाठवला गेला का?

की जाणीवपूर्वक जिल्ह्याचा आवाज दाबला जात आहे?

जनप्रतिनिधींचे मौन संशयास्पद – शेतकऱ्यांचा संतप्त सवाल

शेतकरी संघटनांचा आरोप आहे की,"आम्हाला निवडणुकीत आश्वासन देणारे खासदार-आमदार आता गायब झालेत. नांदेडच्या शेतकऱ्यांसाठी विधानभवनात एकाही आमदाराने आवाज उठवलेला नाही. मग आम्ही न्याय कोणाकडे मागायचा?"

जिल्ह्यातील शेतकरी हवालदिल झाले असून आर्थिक मदतीशिवाय हमीभाव, कर्जमाफी, पीकविमा यांच्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त – सरकारकडे मदतीची याचना

अनेक कुटुंबांची घरे कोसळली

जनावरांचा चारा तुटवडा

शेतकऱ्यांची कर्जबाजारीपणात वाढ

पाण्याखाली गेलेल्या शेतजमिनींत दलदल निर्माण

पीकविमा कंपन्या देखील मदत नाकारण्याच्या तयारीत

कारवाईची मागणी – आंदोलनाचा इशारा

किसान संघटना, युवक संघटना आणि विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी सरकारला ४८ तासांत नांदेड जिल्ह्याला पुरग्रस्त घोषित करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाची चेतावणी देण्यात आली आहे.

## शिवसेना उबाठा पक्षाकडून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका ताकतीने लढा - विनोद घोसाळकर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:-**

दिनांक:०९/१०/२०२५ रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची शासकीय विश्रामगृह येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती त्या आढावा बैठकीला सह संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर, जिल्हाप्रमुख राजेंद्र राठोड हे प्रमुख मार्गदर्शक उपस्थित होते.

राज्यात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी सिल्लोड येथे शिवसेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती या आढावा बैठकीसाठी उपजिल्हाप्रमुख विठ्ठल बदर, सिल्लोड तालुकाप्रमुख रघुनाथ घरमोडे, विधानसभा संघटक रघुनाथ चव्हाण, उपजिल्हा संघटक रावसाहेब गोराडे, तालुका उपप्रमुख रामेश्वर काळे, तालुका उपप्रमुख शिवा दादा गौर, प्रसिद्धी प्रमुख दशरथ सुरडकर, उप तालुका प्रमुख नारायण आहेर, तालुका उपसंघटक भास्कर आहेर, युवा जिल्हाधिकारी केके जाधव, सिल्लोड शहर प्रमुख मच्छिंद्र धाडगे, तालुका संघटक अमोल शिंदे, विभाग प्रमुख गजानन जैस्वाल, शंकर रोठे, प्रभाकर शिंदे, रामेश्वर



एंडोले, दिनकर तांबे, महादु गुंजाळ, नथ्थू मोरे, कृष्णा जाधव यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सह संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत संदर्भात व पक्षाच्या संघटनात्मक विषयासह सखोल असे मार्गदर्शन केले ते म्हणाले की आपल्याला पूर्ण ताकदीनिशी जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपरिषद निवडणूक ही लढायची आहे त्यासाठी आपल्याला आपल्या शाखा अध्यक्ष पासून विभाग प्रमुख सर्कल प्रमुख तालुका उपप्रमुख तालुका संघटक तालुकाप्रमुख उपजिल्हाप्रमुख असा तुम्ही सर्वांनी समन्वयक ठेवून कार्यकर्त्याची टीम बनवायची आहे आणि त्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून तुम्हाला ज्या त्या जिल्हा परिषद गटात या त्या पंचायत समिती गणात आपल्या पक्षाचे उमेदवार उभे करून त्यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत परंतु त्यासाठी तुम्हाला पक्षाचं संघटन मजबूत करणे हे फार महत्त्वाचे आहे आपसातले हेवे दावे, वाद हे बाजूला ठेवून आपण एक पक्षाचे शिपाई म्हणून पक्षाचे शिलेदार म्हणून आपल्याला आपला पक्ष वाढवायचा आहे त्यासाठी आपण कामाला लागले पाहिजेत सिल्लोड तालुक्यामध्ये एकूण ९ गट असून १८ पंचायत समिती गण आहे व एक नगरपरिषद आहे या सिल्लोड नगर परिषदेच्या एकूण १४ प्रभागात आपल्याला आपले उमेदवार उभे करून त्यांच्या पाठीमागे पक्षाची ताकद उभी करून निवडून आणण्यासाठी आपल्याला पुरेपूर ताकद लावावी लागेल त्यासाठी कार्यकर्ता हा सक्षम असला पाहिजे नगर परिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने जो उमेदवार ज्या प्रभागामध्ये निवडणूक किमान त्याचा प्रभाव त्या प्रभागांमध्ये असला पाहिजे जर त्याचा प्रभाव त्या प्रभागामध्ये असेल तर शिवसेना पक्ष त्याच्या पाठीमागे अधिकच ताकद उभी करेल परंतु त्यांनी आतापासूनच निवडणुकीची तयारी केली पाहिजे

तेथील मतदारांनी तुम्ही गेल्यानंतर जवळपास १०० ते २०० लोक तुमच्या अवतीभोवती जमा झाले पाहिजेत जेणेकरून विरोधक सुद्धा तुमच्या ताकतीपुढे हतबल होतील आणि पर्यायाने मतदार आपल्या उमेदवाराची निवड करून आपल्याला निवडून देतील त्यासाठी आपण आजच कामाला लागून न प प्रभाग, पंचायत समिती गण, जिल्हा परिषद गट पिंजून काढायचे आहे. अशा सूचना सुद्धा कार्यकर्त्यांना विनोद घोसाळकर यांनी दिल्या.

तालुकाप्रमुख रघुनाथ घरमोडे यांनी सुद्धा आपल्या भावना व आपण केलेल्या कामाचा आढावा सह संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर यांच्यासमोर मांडून पक्षाची ताकद भविष्यात वाढवण्यासाठी अधिकाधिक परिश्रम घेणार आहोत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार उभे करून त्यांना सुद्धा निवडून आणण्यासाठी प्रयत्नशील राहू असे सुद्धा रघुनाथ घरमोडे यांनी बोलताना सांगितले.

## वृत्तपत्र कामगार जाहीरात संदर्भात विदारक वास्तव्य/ शोकांतीका

**दैनिक युवक आधार -**

**घाटंजी तालुका प्रतिनिधि. महेश पेन्दोर**

मित्र हो पत्रकार समाजाचा आरसा मानला जातो. पत्रकार/वार्ताहर अन्यायाविरुद्ध लेखनितून आवाज उठवतो,जनतेला भेडसावणा-या समस्या,भ्रष्ट्राचार, सामान्य नागरिकांचा प्रश्न लेखनितून शासनापर्यंत पोहोचवतो. पण दुर्दैवाने, याच पत्रकारांना/वार्ताहरांना वर्षभरात विवीध वृत्त,सत्यता,प्रसार-प्रचार वृत्त न चूकता पाठवणारे व वृत्त पाठवल्यावर प्रसिध्दीत येईपर्यंत वारंवार भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधणारे अच्यानक त्याच प्रसिद्धी माध्यम प्रतिनिधि व्यक्तीशि दिपावली,वर्धापण या जाहीरात प्रसंगी दूरावतात. जिकरीण वर्षभर वृतांकण करुन सामाजिक विषय,लोकप्रश्न,भ्रष्ट्राराचाला वाचा फोडणारे, समाजहीतकारक वृत्त करणारे त्यांच्या वृत्तपत्रांसाठी जाहिराती मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो, ही वस्तुस्थिती वेदनादायी आहे. विविध शासनाच्या योजना, विकासकामे आणि जनजागृती संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य हे वृत्तपत्रांद्वारेच होते. मग अशा वर्षभर वृत्ताकणातून जागर करणा-या पत्रकारांना जाहिरातीपासून वंचित ठेवणे म्हणजे त्यांच्या श्रमाचा अपमान नाही काय? मित्र हो वृत्तपत्र जाहिरात ही केवळ आर्थिक मदत नव्हे, तर पत्रकारांच्या कार्याचा अधिकृत सन्मान आहे. अहो ज्या तत्परतेनी बातम्या पाठवताना त्याच तत्परतेनी वर्षांत एक दोन जाहीरात फूल न फूलाची पाकळी समजून स्वखूशिने द्यायला हात मागे येते. मगं पत्रकार/ वार्ताहरां काडून अपेक्षा

> वृत्तपत्र जाहिरात हा दया नव्हे पत्रकारांचा अधिकार आहे.ज्यांचे मणात पत्रकार / वार्ताहर बद्दल सरसकट असलेला गैरसमज काढून टाकावा.सर्वांची लेखनि चालायला लागली तर गैरजमज असणा-यांना पळता भूईवाट सापडणार नाही.
>
> एक जागृत नागरिक तथा पत्रकार/ वार्ताहर हितचिंतक

> सदर संदेशलेखन एक जागृत व सामाजिक भान ठेवून लेखनिच्या माध्यमातून वर्षभर जनतेसमोर विविध विषय जनहीतार्थ लेखन करुन प्रकाशित करणा-या वृत्तपत्र प्रतिनिधि वार्ताहर/पत्रकार बांधव यांचे उत्तम कार्याला समर्पित आहे.
>
> - बाकी जैशि जिसकी सोच

कूठल्या अधिकाराने करता?. लहान आणि ग्रामीण भागातील पत्रकारांना त्यांच्या परिश्रमाचे योग्य फल मिळावे, यासाठी शासनाने पारदर्शक जाहिरात वितरण प्रणाली लागू करणे गरजेचे आहे. लोकशाहीत पत्रकार हा चौथा स्तंभ आहे; त्याला आर्थिक आधार देणे हे शासनाचे कर्तव्य आहे, तसेच वर्षभर झपाटाणे न चूकता बातम्या पाठवून प्रसिद्धी मिळवण्यासाठी उडणारे यांचीही एक जवाबदारी आहे, उपकार नव्हे. फ्लेकसाठी, हजारों पण मेहनतीने लिखानातून प्रसिद्धी देणा-यास नाक मूरडणे हे योग्य नाही.

## खारघर घरकुल ते वास्तु विहार मार्गे नवीन बससेवा सुरू होणार

**दैनिक युवक आधार**

**खारघर वार्ताहर**

खारघर परिसरातील नागरिकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सध्या सुरू असलेल्या बस क्र. ५३ व्यतिरिक्त खारघर घरकुल ते वास्तु विहार मार्गे नवीन बससेवा सुरू करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांच्या वतीने वारंवार करण्यात येत होती.

या मार्गावर चारपेक्षा अधिक शाळा व महाविद्यालये



असून दररोज रेल्वे स्टेशनकडे व परतीच्या प्रवासात नागरिकांना मोठी गैरसोय भासत होती.

त्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवा आगार व्यवस्थापक मा. सुनिलजी जगताप यांची उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिव सेना उपशहर प्रमुख खारघर शहर श्री.नंदु वारुंगसे यांनी भेट घेऊन या मार्गावर नवीन बससेवा सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा करून निवेदन सादर केले.

सुनिलजी जगताप यांनी या मागणीची दखल घेत लवकरच या मार्गावर बससेवा सुरू करण्यात येईल, अशी ग्वाही दिली आहे.

या निर्णयामुळे खारघर परिसरातील प्रवासी, विद्यार्थी तसेच कामकाजासाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, स्थानिक पातळीवर या उपक्रमाचे स्वागत करण्यात येत आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# शिंदेफळ शाळेतील शिक्षकांचा निरोप व स्वागत समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड :-**

दिनांक 7 ऑक्टोबर मंगळवार रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेफळ येथे शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायत शिंदेफळ तर्फे आयोजित प्रशासकीय बदली झालेल्या शिक्षकांचा निरोप व बदलीने नव्याने शाळेत रुजू झालेल्या शिक्षकांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला गावकरी, विद्यार्थी, पालक, सरपंच, उपसरपंच,माजी सरपंच,उपसरपंच, सोसायटी चेअरमन, पोलिस पाटील ,शालेय अध्यक्ष, उपाध्यक्ष,सर्व ग्रामपंचायत सदस्य शालेय व्यवस्थापन समिती सदस्य,अंगणवाडी सेविका, मदतनीस,आशा कार्यकर्ती यांनी शिक्षकांचा फुले उधळून टाळ्यांच्या गजरात व संगीत वाद्याने जल्लोषात स्वागत करत सभामंडपात आदराने नेण्यात आले.

कार्यक्रमापूर्वी महर्षी वाल्मिकी जयंती निमित्त उपस्थितांनी वाल्मिकी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

इयत्ता 7 वी च्या विद्यार्थीनींनी स्वागत गीताने उपस्थितांचे स्वागत केले.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय मुख्याध्यापक सतिष बोराडे, दिव्य मराठी चे प्रतिनिधी श्रीराम डफळ, ग्रामविकास अधिकारी भोटकर साहेब यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

शिंदेफळ शाळेतून बदलीने गेलेले सिद्धेश्वर दौड , धनंजय काटे , मोरे मॅडम,सपकाळे मॅडम,रोठे मॅडम,देवगय्या मॅडम मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी शिक्षिका ढंगारे मॅडम व शिक्षक शिंदे सरांना ग्रामपंचायत व शालेय व्यवस्थापन समिती तर्फे सत्कार करुन त्यांना जड अंतःकरणाने निरोप देण्यात आला.व नव्याने बदलीने आलेल्या निता मडावी,दामोधर मोरे, सुनील वीर, दत्तू हावळे, रावसाहेब मिरगे, अरुणा जंगले यांच्या सह अंगणवाडी सेविका, मदतनीस,आशा कार्यकर्ती यांचा सत्कार करण्यात आला.गणेश भाऊ शिंदे यांनी वारकरी संप्रदाया तर्फे सर्व शिक्षकांचा सत्कार केला. विद्यार्थांनी शिक्षकांना भेट वस्तू दिल्या.

यावेळी शाळेतील विद्यार्थी, पालक व गावकरी यांनी आपल्या भावना मनोगतातून शिक्षकांविषयी व्यक्त केल्या, शेवटी बदली झालेल्या शिक्षकांनी मनोगतातून शाळा गावकरी व विद्यार्थी विषयी दौड सर, काटे सर, मोरे मॅडम, सपकाळे मॅडम व देवगय्या मॅडम यांनी आपले विचार व्यक्त करतांना त्यांना अश्रू अनावर झाले होते, सहशिक्षक सुनील वीर सर व निता मडावी यांनी आपले विचार व्यक्त केले.शेवटी बदली झालेल्या शिक्षकांनी शाळेसाठी मदत म्हणून डिजिटल पेंटींग साठी 30 हजार रुपये दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मोरे सर यांनी तर सूत्रसंचालन पोलिस पाटील संदीप ढंगारे, सहशिक्षक दत्तू हावळे यांनी केले, आभार शालेय अध्यक्ष घनश्याम जाधव यांनी मानले. यावेळी गावकरी, विद्यार्थी,पालक व शिक्षक यांची उपस्थिती होती.

# वर्षवास समाप्ती निमित्त महिलांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर,भगवान बुद्ध,छत्रपती शिवाजी महाराज यांच्या फोटोची प्रतिमा भेट



**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**जितेंद्र खोडे**

**राळेगाव:-**तालुक्यातील चिखली येथील बुद्धविहार येथे वर्षवास महिन्यानिमित्त गेल्या १ महिन्यापासून रोज ग्रंथपाठ वाचन सुरु होते,मागच्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी महिलांची संख्या खुप प्रमाणात वाढली असून, मागील वर्षी लोकेश दिवे मित्रपरिवार तर्फे महिलांना भगवान गौतमबुद्ध यांची फोटो प्रतिमा,मागच्या वर्षी भगवान गौतम बुद्ध वंदनेचे पुस्तक भेट देऊन महिलांचा सत्कार करण्यात आला होता,दरवर्षीप्रमाणे चिखली ग्रामपंचायतचे कार्यक्षम सदस्य लोकेश दिवे मित्रपरिवार तर्फे ४० ते ५० महिलांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर,भगवान बुद्ध,छत्रपती शिवाजी महाराज,यांच्या फोटोची प्रतिमा,भेट देऊन ४० ते ५० महिलांचा सन्मान व सत्कार करण्यात आला, लोकेश दिवे मित्रपरिवार चिखली गावात नेहमी सामाजिक उपक्रमाचे आयोजन करतात,अश्या गावात होणाऱ्या उपक्रमाचे गावातील महिला व नागरिक लोकेश दिवे यांचे कौतुक करत आहे व गावात आनंदाचे वातावरण तयार झाले असून असेच स्तुत्य उपक्रम भविष्यात करत रहा असे जनतेमधून व्यक्त होत आहे आणि असेच सामाजिक कार्य अविरत सुरु राहील असे लोकेश दिवे मित्रपरिवार तर्फे सांगण्यात आले.

# कांद्याचे दर कोसळल्याने शेतकऱ्यांचा संताप — विंचूर येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रास्ता रोको आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**जनार्दन चव्हाण**
**दैनिक युवक आधार**

कांद्याचे दर अतिशय घसरल्यामुळे शेतकऱ्यांच्या सहनशक्तीचा अंत झाला असून, त्यांच्या संतापाचा उद्रेक आज विंचूर येथे झाला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने संभाजीनगर महामार्गावर भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

गेल्या काही दिवसांपासून कांद्याला केवळ ७ ते १० रुपये प्रतिकिलो एवढेच दर मिळत असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक तोट्याला सामोरे जावे लागत आहे. उत्पादन खर्च, वाहतूक व मजुरी यांचा खर्चही निघत नसल्याने शेतकऱ्यांच्या हातात काहीच राहत नाही. या परिस्थितीविरोधात आज स्वाभिमानी शेतकरी



संघटनेचे कार्यकर्ते व मोठ्या संख्येने शेतकरी महामार्गावर उतरले.

या वेळी शेतकऱ्यांनी "कांद्याला हमीभाव द्या", "शेतकरी विरोधी धोरणे बंद करा", "शेतकऱ्यांच्या घामाचे मोल द्या" अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. आंदोलनाचे नेतृत्व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे स्थानिक पदाधिकारी यांनी केले.

प्रशासनाने तत्काळ घटनास्थळी पोहोचून आंदोलकांशी चर्चा केली. काही वेळानंतर

**स्थानिक प्रशासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांचा अहवाल सरकारकडे पाठविण्याचे आश्वासन दिले असून, पुढील काही दिवसांत या विषयावर तोडगा निघण्याची शक्यता आहे.**

पोलीस व प्रशासनाच्या मध्यस्थीने आंदोलन मागे घेण्यात आले. परंतु, शेतकऱ्यांनी इशारा दिला की जर कांद्याच्या दरात सुधारणा झाली नाही आणि सरकारने ठोस उपाययोजना केल्या नाहीत, तर राज्यभरात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

या आंदोलनामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. शेतकऱ्यांचा संताप आणि सरकारकडून मिळणारा प्रतिसाद या दोहोंच्या दरम्यानचा संघर्ष आता अधिक तीव्र होत चालला आहे.

# पिंपळगाव बसवंत जिवाजी महाले जयंती उत्साहात साजरी — नाभिक बांधवांचा एकत्र सहभाग

**दैनिक: युवक आधार**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड**
**(पिंपळगाव बसवंत)**

**पिंपळगाव बसवंत :** नाभिक बांधवांच्या वतीने चिंचखेड चौफुली येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रमी सहकारी व रक्षक शूरवीर जिवाजी महाले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

हा कार्यक्रम पिंपळगाव(ब) चिंचखेड चौफुलीवर असलेल्या नियोजित जागेत पार पडला.या कार्यक्रमाचे आयोजन पिंपळगाव




बसवंत नाभिक समाज यांच्या वतीने करण्यात आले होते याप्रसंगी पिंपळगाव बसवंत शहरातील सर्व राजकीय पक्ष एकत्रित आले होते उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व जिवाजी महाले यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन केले याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज व संत शिरोमणी जिवाजी महाले यांच्या कार्याचा आढावा घेतला तसेच नाभिक समाज यांच्या सुरू असलेल्या व आगामी कार्यांची माहिती उपस्थितांना दिली.कार्यक्रमास पिंपळगाव बसवंत नाभिक समाज संघटनेचे अध्यक्षांसह नाभिक समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सांगवी पाटण येथे अखंड हरिनाम सप्ताह संपन्न

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी : मारुती सत्रे**

तालुक्यातील सांगवी पाटण येथे दोन ऑक्टोबरपासून सुरू झालेला सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह सोमवारी नऊ ऑक्टोबर रोजी संपन्न झाला. सकाळी १० ते १२ या वेळेत काल्याचे किर्तन भागवताचार्य महंत काशिनाथ महाराज शास्त्री यांच्या हस्ते संपन्न झाले.

त्यावेळी महंत भागवताचार्य काशिनाथ शास्त्री यांनी उपस्थितांना संबोधिताना सांगितले की, श्री क्षेत्र सुदर्शन गडावर कोणत्याही जाती-धर्माच्या भाविकांसाठी खुला आहे. कोणताही माणूस तेथे येऊ शकतो. "माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागले पाहिजे. गट-तट बाजूला करून माझ्याकडे या. जो माझ्याकडे येईल, मी त्याचा; मी कोणताही पक्षाचा नाही. आपल्या गावातील पत्रकार समीर शेख यांच्या घरीही मी जेवण करून आलो. ज्या व्यक्तीला जातीवाद करायचा असेल, त्यांनी माझ्याकडे येऊ नये. आपण थोड्या दिवसांची पाहुणे या धर्तीवर; आपण मालक नाही, नोकर आहोत," असे ते म्हणाले.

या सात दिवसांदरम्यान महाराष्ट्रातील नामवंत



कीर्तनकार, प्रवचनकार, गायनाचार्य, मृदंगाचार्य यांच्या सहभागामुळे भजन, कीर्तन, हरिपाठ यांचे कार्यक्रम झाले. गावातील युवक, ग्रामस्थ, महिला यांनी तन-मन-धनाने या अखंड हरिनाम सप्ताहाला यशस्वी करण्यासाठी योगदान दिले.

यावेळी मा. आ. साहेबराव दरेकर, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, मा. जि. प. अध्यक्ष विजय गोल्हार, धामणगाव गटाचे नेते संजय गाढवे, रावसाहेब लोखंडे, लक्ष्मण नन्नवरे, सरपंच दत्तात्रय खोटे, मा. सभापती शत्रुघ्न मरकड, उद्योजक पांडुरंग सोनवणे, पी.आय. बाबासाहेब चव्हाण, राजू भोसले, माऊली भोसले, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार सांगवी पाटण व पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने भाविक-भक्त या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

# तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत पालोदकर महाविद्यालयाची चमकदार कामगिरी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** सिल्लोड येथे सुरू असलेल्या तालुकास्तरीय क्रीडा प्रकारात पालोद येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली. मिळविलेल्या यशाबद्दल राजश्री शाहू शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रभाकरराव पालोदकर, सचिव डॉ राहुल पालोदकर, प्राचार्य अशोक पंडित यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले.

सिल्लोड येथील सुतगिरणी मैदानावर सुरू असलेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत सहकार महर्षी माणिकराव पालोदकर पालोद येथील विद्यार्थ्यांनी चालणे ५ कि.



मी. वयोगट १९ वर्ष प्रथम रितेश गायकवाड, द्वितीय सुनील सपकाळ. चालणे ५ कि. मी. वयोगट १७ वर्ष प्रथम विकास दांडगे. धावणे ३ कि. मी. वयोगट १९ वर्ष प्रथम सोमीनाथ सपकाळ. धावणे १.५ कि. मी. वयोगट १९ वर्ष तृतीय सोमीनाथ सपकाळ. धावणे ३ कि. मी. वयोगट १७ वर्ष प्रथम राजेश गव्हाणे. १०० मी. धावणे वयोगट १७ वर्ष तृतीय कुणाल गव्हाणे. ४०० मी. हडल्स वयोगट १९ वर्ष प्रथम रितेश गायकवाड. तिहेरी उडी वयोगट १७ वर्ष प्रथम हर्षल इंगळे. बांबू उडी प्रथम दीपक साळवे. ४×४०० मी. रिले वयोगट १९ वर्ष प्रथम संघ व सहभागी विद्यार्थी भगवान इंगळे, क्षितिज मोरे, सोमीनाथ सपकाळ, अजिनाथ बरडे विजयी. ४×४०० रिले वयोगट १७ वर्ष प्रथम संघ व सहभागी विद्यार्थी रोहन मुरकुटे, प्रेम सिरसाट, राजेश गव्हाणे, कुणाल गव्हाणे, सोमीनाथ सपकाळ विजयी. ४×१०० रिले वयोगट १७ वर्ष द्वितीय संघ व सहभागी विद्यार्थी रोहन मुरकुटे, प्रेम सिरसाट, राजेश गव्हाणे, कुणाल सोनवणे, सोमीनाथ सपकाळ क्रमांक मिळविला.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाचं व प्रशिक्षक भास्कर केरले, गजानन सपकाळ यांचे अभिनंदन करतांनी प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे म्हणाले की, मेहनत, जिद्द आणि सांघिक भावनेने हे यश मिळवले आहे आणि भविष्यात सुद्धा जिल्हास्तरावर अशीच कामगिरी कराल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक दिलीप जाधव, प्रदीप कानडजे, कृष्णा भांडारे, सुनील तांबे, राजेश ठोंबरे, प्रफुल्ल कळम, सुनील सागरे, कृष्णा पाटील, योगेश निंभोरे, राजाभाऊ भोसले, गणेश दिवटे, विक्की चांदुरकर, डॉ रमेश काळे, संजय जाधव, महादेवी ठवरे, जयश्री चापे, संतुकराव मोरे, अक्षय निकम यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले

# अखिल भारतीय आगरी साहित्य संस्था आयोजित साहित्य संगम सोहळा उत्साहात संपन्नदैनिक युवक अध्यक्ष

**पनवेल (वार्ताहर):**

आखिल भारतीय आगरी साहित्य संस्था आयोजित साहित्य संगम सोहळा अलिबाग तालुक्यातील मांडला येथील ग्रीन किंग रिसॉर्ट येथे शेकडो साहित्यिकांच्या उपस्थिती मध्ये संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक अमृत पाटील हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून अलिबाग नगरपालिकेच्या माजी उपनगराध्यक्षा सौ . मानसी म्हात्रे,संस्था अध्यक्ष कैलास पिंगळे, साहित्यिक सुरेश भोपी , साहित्यिक चंद्रकांत पाटील , आवाज महामुंबईचा चॅनेल चे संपादक श्री मिलिंद खारपाटील , ॲड राकेश पाटील,ज्येष्ठ पत्रकार धम्मशील सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.

आगरी भाषा लोप पावणार नाही.एक आगरी ,लाखांना भारी असे संस्थेचे अध्यक्ष श्री कैलास पिंगळे सर यांनी प्रास्ताविकात सांगितले. आगरी भाषा जोमाने



पुढे जाईल. अनेक नवनवीन पुस्तके आगरी भाषेत येत आहे. नवोदिताचे स्वागत करून, त्यांचे अभिनंदन ॲड मानसी म्हात्रे यांनी केले.तुम्ही उच्चशिक्षीत झाले पाहिजे आणि तुमच्या साहित्यातून तुमचे समृद्ध विचार लोकांपर्यंत पोचवायला हवेत असेही त्या म्हणाल्या. सुरुवातीला वावे ग्रामस्थांचे सुरेख असे गायन आणि भवर नृत्य झाले.यानंतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा शाल, पुष्पगुच्छ,सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.यामध्ये जेष्ठ साहित्यिक सुरेश भोपी, कृष्णा जोशी,मारुती बागडे, अरुण द. म्हात्रे, प्रा.संदेश पाटील,जयंत पाटील ,विकास पाटील ,चंद्रकांत कांडपिले यांचा समावेश आहे. अन्यायाला वाचा फोडणाऱ्या निर्भीड रणरागिणी सौ मानसी म्हात्रे यांना सरखेल पुरस्काराने सन्मानित करून त्यांच्या कार्याची उचित दखल घेण्यात आली. या कार्यक्रमात नंदेश गावंड यांच्या आगरास्त्र या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती गावंड यांनी ओघवत्या शैलीत केले.कार्यक्रमाची सुरेख सांगता सुश्राव्य भजनाने झाली.

# पुरग्रस्तांच्या हृदयात आशेचा दीप उजळवणारी घटना पुराने नेलं सर्वस्व,पण मदतीने उजळवली मुलीच्या संसाराची ज्योत..

**मुलीचा विवाह जवळ असताना संसार वाहून गेला,आमदार राजेश मोरे यांनी दिला 50 हजाराचा धनादेश...**

**दैनिक युवक आधार**
**अमित जाधव**

जालना जिल्ह्यातील पुरग्रस्त शेतकरी कुटुंबाची दयनीय अवस्था झाली होती, आपल्या मुलीचे लग्न जवळ असताना संपूर्ण संसार वाहून गेला पण संवेदनशील मदतीने नव्या आशेचा किरण महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशाने आणि कल्याण लोकसभा खासदार मा. श्री. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाने दाखविला. मराठवाडयात अतिवृष्टीच्या कहराने जालना जिल्ह्यातील अनेक शेतकरी कुटुंबांचं सर्वस्व वाहून गेलं. कुणाचं घर पाण्याने भरलं, कुणाची जनावरं वाहून गेली, कुणाची शेती उध्वस्त झालीत्याचवेळी एका शेतकरी कुटुंबावर दुहेरी संकट कोसळलं, त्यांच्या मुलीचं लग्न काही दिवसांवर येऊन ठेपलं होतं. पण पुराच्या रौद्ररूपाने त्यांच्या संसाराचं अक्षरशः अस्तित्व पुसून टाकलं.हातात काहीच उरले



नाही, आणि मनात फक्त एकच प्रश्न, आता काय करायचे,त्यात आपल्या मुलीचं लग्नही जवळ आले होते,कसं होणार?,

आईवडिलांच्या डोळ्यांत पाणी, मुलीच्या स्वप्नांत निराशेचा अंधार...हे दृश्य पाहून कोणाचेही हृदय भरून येईल. ती मुलगी आपलीच आहे आणि जवाबदारी ही आपलीच आहे या भावनेने तिच्या लग्नासाठी लागणारा बस्त्याचा खर्च रोख स्वरूपात त्या कुटुंबाच्या हाती सुपूर्त करून त्या कन्येचं कन्यादान केल्याचे भाग्य त्या स्वरुपात प्राप्त झाल्याची भावना निर्माण झाली. त्या क्षणी त्या कुटुंबाच्या डोळ्यांत अश्रू नव्हते, तर देवाबद्दलची कृतज्ञता होती. देव कुठेतरी इथेच माणसांच्या रूपात आहे अश्या पद्धतीने ते व्यक्त होत होते. तर समाजात अजूनही संवेदनशीलता, माणुसकी आणि दयाभाव जिवंत असला पाहिजे हे माझे मत आहे असे आमदार,कल्याण ग्रामीण विधानसभा राजेश गोवर्धन मोरे यांनी बोलताना स्पष्ट केल आहे

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मार्गावर पहिला भीषण अपघात; तीन वाहनांची एकमेकांना धडक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या मार्गावर आज दुपारी चार वाजण्याच्या आसपास झालेल्या पहिल्याच अपघाताने परिसरात खळबळ उडाली. नव्याने तयार झालेल्या या मार्गावर बेफाम वेगाने जाणाऱ्या तीन गाड्या एकमेकांना जोरदार धडक देत अपघातग्रस्त झाल्या. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र सर्व गाड्यांचे मोठे नुकसान झाले आहे.



पनवेल शहरा कडून विमानतळाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून वेगाने जाणाऱ्या एका कारने समोरून येणाऱ्या टेम्पोला जोरदार धडक दिली. धडकेचा आवाज एवढा मोठा होता की आसपासच्या नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्या क्षणी मागून येणारी आणखी एक कार या अपघातग्रस्त वाहनांना येऊन धडकली आणि त्यामुळे तिन्ही वाहने एकमेकांवर आदळली. अपघात एवढा विचित्र आणि भीषण होता की, या मध्ये छोटा टेम्पो रस्त्यातच पलटी झाला त्या मुळे काही वेळ रस्ता पूर्णतः बंद झाला होता. स्थानिक रहिवाशांनी व वाहनचालकांनी तत्काळ बचावकार्य सुरू करून जखमी टेम्पोचालकाला बाहेर काढले. त्याला किरकोळ दुखापत झाली असून उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. सध्या या अपघाताची नोंद संबंधित पोलिस ठाण्यात करण्यात आली असून, अपघाताचे कारण तपासले जात आहे.

नव्याने उभारल्या जाणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मार्गावर हा पहिलाच अपघात असल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात बांधकाम साहित्य, वाहनांची वाहतूक सुरू असते. त्यामुळे वाहतूक नियमांचे काटेकोर पालन व सावधगिरी बाळगण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. या घटनेमुळे विमानतळ मार्गावरील सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिकाऱ्यांनाही सजग राहावे लागणार आहे. सुरुवातीच्या तपासानुसार, वेग आणि बेफिकिरी हे या अपघातामागचे मुख्य कारण असल्याचे प्राथमिक निष्कर्ष समोर येत आहेत.

# उरण कोटगावचा पार्थ भोईर राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण पदकाचा मानकरी

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

वेटलिफ्टिंग हा एक स्पर्धात्मक ताकतीचा खेळ आहे. या खेळाचे मुख्य दोन प्रकार आहत. खेळाडू तीन प्रयत्नामध्ये सर्वात जड वजन उचलण्याचा प्रयत्न करतात ,आणि सर्वात जास्त वजन यशस्वीपणे उचलणारा खेळाडू जिंकतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त हा खेळ आहे . आणि तो ऑलिम्पिक तसेच इतर अनेक स्पर्धांमध्येहि खेळला जातो.

या खेळाने शारीरिक शक्ती, आरोग्य तंदुरुस्ती वाढवण्यासाठी महत्त्वाचा आहे .याव्यतिरिक्त हे खेळाडूंना स्नायू आणि सौंदर्यात्मक शरीर विकसित करण्यासही मदत करते.




उरण तालुक्यातील कोट नाका गावचा पार्थ मिलिंद भोईर याने दिल्लीत डब्ल्यूपीआरएफ या स्पर्धेत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे. दिनांक ४ व ५ ऑक्टोबर २०२५ रोजी दिल्ली येथे पार पडलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत पार्थ ने हि चमकदार कामगिरी केली आहे.

सामान्य कुटुंबात जन्मलेला घरची बेताची परिस्थिती आई गृहिणी व वडील मिलिंद भोईर रिक्षा चालक असून अशा कठीण परिस्थितीत त्यांनी दिल्ली येथे झालेल्या वेटलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली आहे.

दिल्ली येथे झालेल्या स्पर्धेत देशभरातील अनेक स्पर्धक सहभागी झाले होते. पार्थने जिद्द, मेहनतीच्या जोरावर सुवर्णपदकावर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

पार्थच्या या नेत्र दीपक कामगिरीमुळे त्यांचे पालक ,कोटगाव ग्रामस्थ, शिक्षक, प्रशिक्षक, मित्रपरिवार अशा सर्वच स्तरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पार्थने आपल्या चमकदार कामगिरीमुळे आपल्या कोटगाव,उरण तालुकाच नाही तर देशात आपल्या गावाचे नाव उंचावले आहे.

# जय भवानी महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन विभागीय काव्यवाचन स्पर्धा...

## शिक्षणमहर्षी शिवाजीराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(प्रतिनिधी)-**

पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयात माजी मंत्री शिक्षणमहर्षी श्री.शिवाजीराव दादा पंडित यांच्या ८८ व्या वाढदिवसा निमित्त भव्य स्वरुपात आंतरमहाविद्यालयीन विभागीय काव्य वाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील स्पर्धा सोमवार दिनांक १३ ऑक्टोबर रोजी सकाळी ठिक १०:०० वाजता सांस्कृतिक सभागृहामध्ये या काव्य वाचन स्पर्धा सुरू होणार आहेत. या स्पर्धेसाठी प्रत्येक महाविद्यालयाच्या एका स्पर्धकाला सहभाग घेता येईल. या काव्यवाचन स्पर्धेत प्रथम पारितोषीक रोख ५०००/- रुपये, स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र, द्वितीय पारितोषीक रोख ३०००/- रुपये, स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र, तृतीय पारितोषीक रोख २०००/- रुपये, स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र या स्वरुपात बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. तरी ज्या स्पर्धकांना काव्यवाचन स्पर्धेत सहभाग घ्यावयाचा आहे. त्यांनी संयोजन समितीतील प्रा.बापू घोक्षे मो.न.- ९४२०८१६६६६,




प्रा. डॉ.रामकृष्ण प्रधान मो.नं.- ९५२६३८८१५६, प्रा. डॉ.कल्पना घारगे मो.नं.- ९४२३७१६१७१ व प्रा. डॉ.अशोक देवगुडे मो.न.- ८६६८२७१५१९ यांच्याशी संपर्क साधावा. तरी मराठवाड्यातील जास्तीत जास्त महाविद्यालयांनी या विभागीय काव्यवाचन स्पर्धेसाठी आपला सहभाग नोंदवावा असे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम व प्र.प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे यांनी आयोजन समितीच्या वतीने आवाहन केले आहे.

# वलखेड येथील जिल्हा परिषद शाळेवर आता असणार सी.सी.टी.व्ही.कॅमेऱ्याची नजर

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना(अशोक ठोके)**

मौजे वलखेड, तालुका परतूर, जिल्हा जालना येथील जिल्हा परिषद शाळेवर आता सी.सी. टी.व्ही.कॅमेऱ्याची नजर असणार आहे.जिल्हा परिषदेच्या ग्रामीण भागातील शाळाही आता शहरी भागातील शाळेप्रमाणे होताना दिसत आहेत. ग्रामीण भागातील गोरगरीब मुलांनाही शहरी भागातील इंग्रजी शाळांप्रमाणे दर्जेदार शिक्षण मिळावे, चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी शिक्षक व प्रशासनाकडून प्रयत्न केले जात आहे. परतूर तालुक्यातील वलखेड येथील जिल्हा परिषद शाळा परिसरात आता सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या सुरक्षेचा प्रश्नही आता मिटला असून शहरातील इंग्रजी माध्यमातील शाळांप्रमाणे ग्रामीण भागातील शाळांमध्येही दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे मुख्याध्यापक खवल यांनी म्हटले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक ध्येयासाठी तसेच उत्तम प्रकारचे दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी सर्व शिक्षक वृंद तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी अतोनात प्रयत्न करीत आहेत. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे, असे पालक आपल्या मुलांना शिक्षणासाठी शहरांमध्ये पाठवताना दिसत आहेत परंतु शेतमजूर कष्टकरी गोर गरीब जनतेच्या मुलांना सुद्धा मोफत दर्जेदार व शिस्तबद्ध - शिक्षण देण्यासाठी वलखेड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये सध्या बदल होत आहे.

पालकांनी आपल्या मुलांना शहरी भागात शिक्षणासाठी न पाठवता गावातील शाळेमध्ये त्यांचा प्रवेश घ्यावा असे आवाहन शाळेचे मुख्याध्यापक एस.एस. खवल व शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष लक्ष्मण बिल्हारे,उपाध्यक्ष सुनिल सुरुंग व शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व सर्व शिक्षकवृंद यांनी केले आहे.



# हेलपाटा कादंबरीचा हैद्राबाद येथील उस्मानिया विद्यापीठाच्या एम ए च्या अभ्यासक्रमात समावेश

## लेखक तानाजी धरणे यांच्या लेखणीचा सन्मान ...!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई:-(प्रमोद तरळ)**

संघर्षमय हृदयस्पर्शी हेलपाटा कादंबरीचा हैद्राबादच्या उस्मानिया विद्यापीठात एम.ए. च्या सन : २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आल्याचे प्रा .डॉ .नम्रता बागडे मराठी विभाग प्रमुख उस्मानिया विद्यापीठ हैद्राबाद यांनी दुरध्वनीद्धारे कळवून श्री तानाजी धरणे यांचे अभिनंदन केले आहे . त्यामुळे गावगाड्यात ग्रामविकासाचा गाडा हाकणाऱ्या ग्रामीण लेखकाचा सन्मान झाल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

तानाजी धरणे यांना शालेय जीवनातच कविता करण्याची आवड होती. त्यांनी इयत्ता सातवीत असताना सन १९८९ साली आपल्या काव्य लेखनाला सुरुवात केली होती. ते पुढे सन १९९४ पर्यंत कविता लिहित होते . परंतु घरची कमालीची गरीबी व सतत अठरा विश्व दारिद्र्य यामुळे त्यांना दहावीत असताना त्यांच्या शिक्षिका आदरणीय प्रभावती आवारी मॅडम यांनी कविता करुन तुझे पोट भरणार नाही. तेव्हा आधी स्वत:च्या पायावर उभा रहा व मग तुला कविता लिहिण्यापासुन कोणी आडवणार नाही असा सल्ला दिला. म्हणून त्यांनी सन १९९४ मध्ये आपले काव्यलेखन बंद केले. पुढे संघर्ष करत त्यांनी ग्रामसेवकाची नोकरी मिळवली .

गावगाड्यात काम करत असताना त्यांच्या लिखाणात खंड पडला तो अगदी पंचवीस वर्षाचा. पुढं एका प्रसंगातून त्यांची पत्नी शिक्षिका असलेल्या पुष्पा धरणे यांच्या प्रोत्साहनमुळे सन २०२० पासून त्यांनी पुन्हा कविता लेखनास नव्याने प्रारंभ केला. पहाता - पहाता त्यांचे "शेताच्या बांधावर , सांजवेळ , स्वप्नचित्र , होरपळ , चांदण पेरित जाऊ व नांगरतो तळहाताच्या रेषा " हे सहा कविता संग्रह प्रकाशित झाले असून त्यांची ' पायपीट ' सामाजिक आशायाची कादंबरी ज्ञानसिंधु प्रकाशन, नाशिक कडून प्रकाशनाच्या वाटेवर आहे. तसेच 'मुलाफुलांची बाग ' हा बालकवितासंग्रह ज्ञानपथ प्रकाशन, अमरावती यांजकडून प्रकाशनाच्या मार्गावर आहे. पुढे महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक अभ्यासक्रम व संशोधन मंडळ बालभारती ' किशोर ' मासिकातही त्यांच्या कविता येवू लागल्या त्यामुळे तानाजी धरणे यांचे सर्वत्र नाव होऊ लागले. त्यांचा सोशल मिडियावर मोठा चाहता वर्ग आहे. परंतु त्यांना खरी लेखक म्हणुन ओळख दिली ती ५ मार्च २०२३ मध्ये पी. आर. ग्रुप ऑफ पब्लिकेशन, वरुड अमरावती या प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या हेलपाटा या कादंबरीने.

हेलपाटा ही कादंबरी पहाता -पहाता जनमाणसात खुप प्रसिद्ध झाली. कादंबरीच्या एका पाठोपाठ आवृत्या निघत गेल्या. त्यातच हेलपाटा कादंबरीला राज्यातील अनेक नामांकित संस्थांनी उत्कृष्ठ कादंबरीचे १८ राज्यस्तरीय पुरस्कार दिले .अन्य तीन सामाजिक संस्थानीही हेलपाटाचा यथोचित असा गौरव केला .सध्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे प्रा.धनंजय काळे हे हेलपाटा कादंबरीसह अन्य कादंबरीवर पीएच. डी. संशोधन करत आहेत. तसेच श्रीमती उज्वला मगर याही हेलपाटासह अन्य कादंबऱ्यावर छत्रपती संभाजीनगर येथे डॉ . बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठात पीएच. डी. संशोधन करत आहेत. त्यांची आगामी 'पायपीट' ही सामाजिक आशायाची कादंबरी नाशिकच्या ज्ञानसिंधु प्रकाशनाकडून प्रकाशित होत आहे. तसेच हेलपाटा कादंबरीची सहावी आवृत्तीही नाशिकच्या ज्ञानसिंधु प्रकाशनाने प्रकाशित केली. आत्ता हेलपाटाचा विद्यापीठ स्तरावर एम.ए.च्या अभ्यासक्रमात समावेश झाल्यानं गावगाड्यात ग्रामसेवक (ग्रामपंचायत अधिकारी ) या सारख्या किचकट पदावर काम करताना त्यांनी आपली साहित्यलेखनाची कला जोपासली त्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्याबद्दल त्यांचे सहकारी, मित्र मंडळींनी व अधिकारी वर्गाने त्यांचे विशेष कौतुक केले आहे. आपल्या संघर्षमय हृदयस्पर्शी कादंबरीचा विद्यापीठात एम.ए. च्या अभ्यासक्रमात समावेश केल्याबद्दल तानाजी धरणे यांनी उस्मानिया विद्यापीठ अभ्यासक्रम समितीतील सन्मानिय सदस्य सीनियर प्रा .डॉ .शैलेंद्र लेंडे सर ,सीनियर प्रा . डॉ .चंद्रकांत वाघमारे सर,प्रा .अनमोल शेंडे सर, प्रा . रुपेश कऱ्हाडे सर,प्रा . डॉ .पद्माकर तामगाडगे सर व मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ.नम्रता बागडे मॅडम, प्रा. अरुण कुलकर्णी तसेच सन्मा.कुलगुरु साहेब, उपकुलगुरु सर व व्यवस्थापन मंडळ आणि सर्व रसिक वाचक चाहते हेलपाटा परीक्षक तसेच साहित्यिक मित्र प्रा.डॉ. दीपक सूर्यवंशी सर धाराशिव व यांचे आभार मानले . तसेच आपली हेलपाटा ही संघर्षमय हृदयस्पर्शी कादंबरी विद्यापीठ स्तरावर विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाला लागली याबद्दल मनोमन खूप आनंद झाल्याचे श्री . तानाजी धरणे यांनी सांगितले .

# रिसोड तालुक्याचा अतिवृष्टी मदती मध्ये समावेश करण्यात यावा याबाबत मुख्यमंत्री व कृषी मंत्री यांना भाजपाचे लखनसिंह ठाकुर यांनी पत्राद्वारे मागणी केली

**दैनिक युवक आधार**
**रिसोड, रणजीत सिंह ठाकुर**

तालुक्यांमध्ये जून 2025 ते सप्टेंबर महिन्यामध्ये अतिवृष्टी झालेल्या रिसोड तालुक्या ला अतिवृष्टी मदतीमध्ये समावेश करण्याबाबत

तालुक्यांमध्ये जून 2025 ते सप्टेंबर 2025 मध्ये ढग सदृश्य परिस्थिती निर्माण होऊन 3 वेळेस पहिली 25 व 26 जून दुसरी 21 व 22 जुलै व तिसरी 15 ते 18 ऑगस्ट अशाप्रकारे तीन वेळेस अतिवृष्टी झाली व सतत पाऊस



झाल्यामुळे शेती पिकाचे अतोनात नुकसान झाले मशागती व पेरणी पासून सारखा पाऊस पडून व तालुक्यातील अनेक मंडळामध्ये अतिवृष्टी होऊन शेतकरी बांधवांच्या अतोनात नुकसान झाले पैनगंगा नदीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात रिसोड तालुक्यातून जाते पैनगंगा नदीकाठच्या जमिनीत अक्षरशः सर्वच खरडून गेल्या त्यामुळे या वर्षी तालुक्यातील शेतकऱ्यावर खूप मोठ्या नापीके संकट ओढावला गेला त्यामुळे शेतकरी बांधव अत्यंत अडचणी सापडलेला आहे त्याकरिता आपणास नम्र विनंती आहे की शेतकरी बांधवांना या संकटातून बळ मिळण्याकरता विशेष सवलती मध्ये अतिवृष्टी झालेल्या रिसोड तालुक्याला मदत मिळण्याकरिता रिसोड तालुका सुद्धा दुष्काळग्रस्त यादीमध्ये घेण्यात यावा त्याचप्रमाणे रिसोड तहसीलदार यांनी सर्वेचे व पंचनामे आदेश देऊन सर्वे करण्यात आले होते परंतु त्यामध्ये सुद्धा ेक्टरी फक्त 8500 ही मदत सुद्धा अपुरी आहे ती सुद्धा वाढवून देण्यात यावी याबाबत आपल्याला राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब व आपल्या राज्याचे कृषिमंत्री तथा वाशिम जिल्हा पालकमंत्री दत्ता मामा भरणे यांच्याकडे लखन सिंह ठाकुर यांनी पत्राद्वारे मागणी केली

# दिवाळी निमित्त बच्चे कंपनीसाठी किल्ल्यांच्या निर्मितीला सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

दीपावली सण जवळ येताच पनवेलमध्ये पारंपरिक किल्ले बनवण्याची जुनी परंपरा पुन्हा जिवंत झाली आहे. कुंभारवाडा परिसरात या वर्षीही उत्साहात छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले आणि शूर मावळ्यांच्या प्रतिकृती बनवण्याचे काम सुरू झाले आहे.

माती, विटा, रंग आणि मेहनतीच्या जोरावर तयार होणारे हे किल्ले पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांची गर्दी होत आहे. आजच्या मोबाईलच्या युगात लहान



मुले डिजिटल खेळात रमलेली असताना, त्यांना स्वराज्याचा इतिहास आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रम ओळखून देण्यासाठी ही परंपरा प्रेरणादायी ठरत आहे. ज्येष्ठ नागरिक, पालक आणि तरुण एकत्र येऊन मुलांना या कामात सहभागी करून घेत आहेत.

किल्ल्यांवर छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे, तोफ, ध्वज, किल्ल्याच्या तटबंदीची सजावट आणि मावळ्यांच्या प्रतिमा लावून संपूर्ण दृश्य जिवंत करण्यात येते. दीपावलीत या किल्ल्यांमुळे केवळ सणाची शोभा वाढत नाही, तर स्वराज्य आणि इतिहासाबद्दल अभिमानाची भावना प्रत्येकाच्या मनात जागवली जाते.

# कोयाळी ( बु )येथील स्व. सिताराम दशरथ भिसडे यांच्या स्मुर्तीदिनी भव्य कीर्तनरुपी सेवेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी**
**करण धोंगडे**

**वाशिम :-** दि. 11/10/2025 रोजी मौजे. कोयाळी (बु) ता. रिसोड,श्री. संत गजानन महाराज संस्थान कोयाळी (बु) परिसरामध्ये सायं ठीक 9 ते 11 रोज शनिवार कोयाळी भिसडे येथील आमचे श्रद्धास्थान स्व.सिताराम दशरथ भिसडे ( आजा )यांच्या प्रथम वर्षश्राद्ध स्मृती दिनाचे औचित्य



साधून सुप्रसिद्ध कीर्तनकार, भागवताचार्य ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज टेकाळे ( शास्त्री ) आळंदीकर यांचे भव्य कीर्तनरुपी सेवेचे आयोजन करण्याचे योजीले आहे,तरी जास्तीत जास्त संख्येने या कीर्तनाचा लाभ घ्यावा व हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कोयाळी (बु ) ग्रामस्थ मंडळी यांच्या वतीने करण्यात आले आहे..

# आष्टीत वीर जिवाजी महाले यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी**
**मारुती सत्रे**

छत्रपती शिवाजी महाराजांचे निष्ठावान योद्धे वीर जिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त आष्टी येथे गुरुवार ९ ऑक्टोबर रोजी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भाजी मंडईमधील जिवा महाले चौकात जिवाजी महाले यांच्या प्रतिमेला आष्टी शहरातील नाभिक समाज बांधवांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या कार्यक्रमात नाभिक संघटनेचे अध्यक्ष प्रवीण कदम, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, भाजपचे माजी शहराध्यक्ष बाबुराव कदम, दिलीप कदम, महादेव कदम, संजय वखरे, शरद राऊत, म्हातारदेव पंडित, बाला कदम, कैलास कदम, बबन कदम, विष्णू पवळ, अंबादास कदम, सागर कदम, पवन कदम, दादा कदम, अक्षय कदम, किरण कदम, गोविंद कदम, गणेश राऊत, ओंकार कदम, विराज कदम, कृष्णा कदम, लखन कदम, सार्थक माने, शुभम राऊत, सारंग कदम, ऋषिकेश कदम, टायगर कदम, जॉन कदम, पांडुरंग दळवी, भागवत कदम या नाभिक समाजातील युवक बांधवांची उपस्थिती होती.



# निफाडमध्ये खड्ड्यांवरून संतापाचा उद्रेक!

## स्ट्रेचरवर झोपून विक्रम दादा रंधवे यांचे तहसील कचेरीसमोर रास्ता रोको आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**
**निफाड :**

नाशिक–छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील पिंपळस ते विंचूर दरम्यान पडलेल्या प्रचंड खड्ड्यांमुळे वाहनचालकांचे हाल होत असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याने आज निफाडमध्ये संतापाचा उद्रेक झाला. शिवसेना (युवासेना) तर्फे जिल्हाप्रमुख विक्रम दादा रंधवे यांच्या नेतृत्वाखाली तहसील कचेरीसमोर खड्ड्यात स्ट्रेचरवर झोपून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.




सकाळी सुरू झालेल्या या आंदोलनामुळे नाशिक–छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील वाहतूक जवळपास दोन तास ठप्प झाली. सुमारे दोन ते अडीच किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने सायंकाळी घराकडे परतणाऱ्या प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

ढोल-ताशांच्या गजरात शिवसैनिकांनी "खड्डे बुजवा, जनता वाचवा" अशा घोषणा देत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्क्रीय कारभाराचा तीव्र निषेध नोंदवला. यावेळी विक्रम रंधवे यांनी सांगितले की, "जोपर्यंत खड्डे बुजवले जात नाहीत, तोपर्यंत मी या खड्ड्यातून उठणार नाही," असा निर्धार केला. त्यांच्या या आंदोलनाची दृश्ये सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहेत.

दरम्यान, निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी अधिकाऱ्यांना फोन करून आंदोलनाची माहिती दिली; मात्र बांधकाम विभागाचे अधिकारी घटनास्थळी न आल्याने शिवसैनिकांचा संताप अनावर झाला. अखेर दोन तासांनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे मोहिते घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी दिवाळीपूर्वी पिंपळस ते विंचूर मार्गावरील सर्व खड्डे बुजवण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

या आंदोलनात शिवसेनेचे संजय दादा कुंदे, ललित गीते, अनिल बीवाल, शिवा पाटील, निवृत्ती जगताप, बापूसाहेब कुंदे, अरुण डांगळे, नीरज चोरडिया, विजय व कैलास धारराव, तुषार गांगुर्डे, सुयोग गायकवाड, अमोल वडघुले, किरण वाघ, सुवास सुरळीकर, सचिन खडताळे आदींसह मोठ्या संख्येने शिवसैनिक व युवासैनिक उपस्थित होते.

# रेल्वेच्या तिकिटाची काळाबाजारी करणाऱ्या आरोपीवर रेल्वे पोलिसांची कार्यवाही....

**दैनिक युवक आधार**
**जालना(अशोक ठोके)**

रेल्वेच्या तिकिटाची काळा बाजारी करणाऱ्या एका आरोपीस रेल्वे सुरक्षा बल, जालना ने घेतले ताब्यात घेतले आहे सविस्तर वृत्त असे की रेल्वे सुरक्षा बल,सायबर सेल सिकंदराबाद यांनी परीक्षण करून काही संशयित पर्सनल युजर आयडी जालना हद्दीत सुरू असल्याची गुप्त माहिती रेल्वे सुरक्षा बल,जालना यांना दिली होती यासाठी वरिष्ठ मण्डल सुरक्षा आयुक्त श्री. अमित प्रकाश मिश्रा व सहा सुरक्षा आयुक्त श्री बिपलब दास गुप्ता यांच्या मार्गदर्शनात निरीक्षक श्री पवन इंगळे व उप निरीक्षक श्री. विजय वाघ, सहा उप निरीक्षक तेजराव वानखडे,कॉन्स्टेबल संदीप जाधव,महिला कॉन्स्टेबल कु.पूजा यांच्या पथकाने आज दिनांक 06.10.2025 रोजी संशयित इसमास पद्मावती नगर, जालना येथुन ताब्यात घेउन चौकशी केली असता त्याचे नाव सोनुकुमार उपेंद्र यादव वय -23 वर्ष, राहणार पद्मावती नगर जालना असून त्याने कबुली दिली की, तो विना परवाना रेल्वेचे अनधिकृतपणे रेल्वेचे ऑनलाईन टिकिट काढून विक्री करण्याचा व्यवसाय करतो.




यासाठी तो पर्सनल युजर आयडीचा वापर करून तत्काळ तिकीट काढतो त्याच्या ताब्यातून 59317.05 रुपये किमतीचे रेल्वे ई तिकीट जप्त करण्यात आलेले आहे व या अगोदर काढलेले रुपये 1,50,850.48 किमतीचे टिकिट सुध्दा जप्त करण्यात आले आहे.

एकूण 2,10,167.53 रूपये किमतीचे125 आरक्षित रेल्वे तिकीट जप्त केले असून रेल्वेअधिनियम -1989 च्या कलम 143 नुसार गुन्हा दाखल करून पुढील तपास श्री.विजय वाघ उप- निरीक्षक रेल्वे सुरक्षा बल, परतूर हे करीत आहेत.

# भारत कन्या कनिष्ठ महाविद्यालयाचा कबड्डी संघ जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये उपविजेता

**दैनिक युवक आधार**
**रिसोड. रणजितसिह. ठाकूर**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, अंतर्गत क्रीडा अधिकारी कार्यालय वाशिम व जिल्हा क्रीडा परिषद वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय कबड्डी क्रीडा स्पर्धा पार्वतीबाई राठोड कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मंगरूळपीर जि. वाशिम येथे दिनांक 9 ऑक्टोबर रोजी पार पडली असता या क्रीडा स्पर्धेमध्ये रिसोड तालुक्यातील एकमेव भारत माध्यमिक कन्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी अंडर - 19 कबड्डी अंतिम फेरीमध्ये दिमागदार प्रवेश




मिळवत उपविजेतेपदाचा बहुमान मिळवला आहे. विशेष करून उपांत्य फेरीमध्ये अष्टपैलू बहुआयामी विद्यार्थिनी कु.किरण कैलास पवार या एकटीने उत्कृष्ट पकड करून 22 पॉईंट विरोधी संघावर लावले. 24 विरुद्ध 6 गुणांनी अंतिम फेरीमध्ये प्रवेश निश्चित केला. अंतिम फेरीमध्ये बाळासाहेब गोटे महाविद्यालय कोकलगाव ता. वाशिम या संघाकडून मात्र पराभव पत्करावा लागला.

तरी जिल्हास्तरीय उपविजेता म्हणून भारत कन्या कनिष्ठ महाविद्यालय रिसोड च्या विद्यार्थिनीं किरण पवार कप्तान, वैष्णवी डीन्डरकर उपकप्तान, पुनम सदार, किरण सदार, संजीवनी धांडे, प्रियंका ढोले, सरिता खंडारे, कार्तिकी गव्हाणे, प्रतीक्षा खरात व अर्पिता खरात या विद्यार्थिनीसह क्रीडा शिक्षक मार्गदर्शक प्रा. पंजाब परसराम पानझाडे व प्रा.गुलाब श्रीपत साबळे या मार्गदर्शक शिक्षकाचे भारत कन्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या सन्माननीय प्राचार्या मंजुषा सु.देशमुख मॅडम, आदरणीय पर्यवेक्षक सुनील डहाळके सर यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी यांचे अभिनंदन व कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जय भवानीच्या कु.अमृता आवारे हिला किक बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्ण पदक

## शिवछत्रावर आ.विजयसिंह पंडित यांच्या शुभ हस्ते सत्कार...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी )-**

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु.आवारे अमृता कैलास हिने डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरच्या खुलताबाद येथील चिस्तिया महाविद्यालयात झालेल्या आंतरमहाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवुन ग्रामीण भागातील या महाविद्यालयाच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला आहे. कु.अमृता आवारे हिने सुवर्ण पदक मिळविल्याबद्दल बीड येथे शिवछत्रवर आ.विजयसिंह पंडित



व प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या शुभ हस्ते कु.अमृता आवारे तिच्या आई-वडिला समवेत सत्कार करण्यात आला. कु.अमृता आवारे हिला क्रिडा विभाग प्रमुख प्रा. डॉ.प्रविण शिलेदार यांचे अनमोल मार्गदर्शन मिळाले. कु.अमृता आवारे हिने ग्रामिण भागातुन किक बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्ण पदक मिळविल्या बद्दल तिचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री मा.श्री.शिवाजीराव दादा पंडित, अध्यक्ष माजी आ.अमरसिंह पंडित, सचिव.मा.श्री.जयसिंह पंडित, आ.विजयसिंह पंडित, युवा नेते श्री. रणवीर पंडित, युवा नेते श्री.पृथ्वीराजे पंडित, श्री. अमृत डावकर, श्री.प्रमोद गोरकर, श्री.प्रताप हातोटे, प्रा.काशीनाथ गोगुले, विकास समिती सदस्य. श्री.दिलीपराव जाधव, प्राचार्य डॉ.विश्वास कदम, प्र.प्राचार्य सोमनाथ घाडगे व सर्व प्राध्यापक वृंदानी हार्दिक अभिनंदन ! करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा ! दिल्या कु.अमृता आवारे या ग्रामिण भागातील मुलीने सुवर्ण पदक मिळविल्या बद्दल तिचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे.

# शिवसेना (ऊबाठा) मंठा सचिव पदी दत्ता काळे यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**राजू शिंदे महाराष्ट्र उपसंपादक**

हिंदुहृदयसम्राट मा.शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने शिवसेना पक्षप्रमुख मा.श्री उद्धवसाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेना प्रमुख मा.आमदार आदित्य साहेब ठाकरे, मा.आमदार वरुण सरदेसाई साहेब मा.श्री. गणेश भाऊ काळे युवासेना जिल्हाप्रमुख जालना, यांच्या सुचनेवरुन मा.श्री.दत्ता काळे यांची युवासेना सचिव प्रमुख मंठा या पदावर नियुक्ती करण्यात



आली यावेळी नियुक्ती पत्र देताना मा.श्री.डिगांबर बोराडे युवासेना तालुकाप्रमुख मंठा.तथा : संस्थापक अध्यक्ष : धर्मवीर शंभु राजे बहुउद्देशींय सेवाभावी संस्था मंठा.आवेश पठाण युवासेना उप तालुका प्रमुख मंठा.युवासेना उप तालुका प्रमुख सिद्धेश्वर खंदारे. विभाग प्रमुख गोपाळ खंदारे. सुखदेव बोराडे.अखिल कुरेशी. आदी युवासेना पदाधिकारी उपस्थित होते.

# भाऊचा धक्का–रेवस सेवा सुरू, पर्यटकांना दिलासा

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

--------------------------

चार महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर भाऊचा धक्का–रेवस जलवाहतूक आजपासून पुन्हा सेवेत ,पावसाळ्याने घेतली उसंत, प्रवाशांना मिळाला दिलासा कोकणप्रेमींसाठी आनंदाची बातमी!चार महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर अखेर समुद्रमार्गाने कोकणात जाणाऱ्यांसाठी मोठा दिलासा! पावसाळ्यामुळे बंद असलेली भाऊचा धक्का–रेवस प्रवासी बोटसेवा आज, शुक्रवार १० ऑक्टोबरपासून पुन्हा सुरू होत आहे.सकाळी साडेसहा वाजता पहिली बोट भाऊचा धक्का येथून सुटणार असून, सायंकाळी ४ वाजता शेवटची



फेरी सुटेल, अशी माहिती मुंबई जलवाहतूक संस्थेचे सचिव शराफत मुकादम यांनी दिली.समुद्र शांत... लाटांचा मंद गारवा... आणि पुन्हा सुरू झाली सागरी सफर!पावसाळ्यात उंच लाटा, वादळी वारे आणि समुद्रात उठणारे उधाण यामुळे खबरदारी म्हणून ही सेवा बंद ठेवण्यात आली होती. आता मात्र हवामानाने उसंत घेतल्याने सागर पुन्हा शांत झाला आहे. सूर्यकिरणांनी न्हालेलं पाणी, बोटीच्या बाजूने उडणाऱ्या पांढऱ्या चकचकीत लाटा, आणि मागे सोडत जाणारी मुंबईची रुपेरी किनारपट्टी या दृश्यांनी पुन्हा एकदा प्रवाशांची सफर रंगतदार होणार आहे. सुरक्षिततेला प्राधान्य, वेळापत्रक हवामानानुसार बदलणार दरवर्षी पावसाळ्यात प्रवाशांच्या सुरक्षेसाठी भाऊचा धक्का- रेवससह सर्व सागरी सेवा बंद केल्या जातात.गेटवे–मांडवा आणि मोरा–भाऊचा धक्का बोटसेवा काही आठवड्यांपूर्वी सुरू झाल्या असल्या तरी रेवसमार्ग खोल समुद्रातून जात असल्याने त्यास उशीर झाला होता. हवामानात परतीचा पाऊस किंवा चक्री वादळाचा इशारा मिळाल्यास वेळापत्रकात फेरबदल केले जातील, अशी माहितीसंस्थेकडून देण्यात आली आहे. कोकणप्रेमी प्रवाशांचा आनंद 'पुन्हा मिळाला सागरमार्गाचा श्वास!'या मार्गावरून दररोज हजारो प्रवासी, पर्यटक आणि कोकणातील नागरिक प्रवास करतात.

पावसाळ्यात रस्त्यांवर वाहतुकीची कोंडी वाढल्याने अनेकांना गैरसोय होत होती. आता पुन्हा बोटसेवा सुरू झाल्याने कोकणात जाणं सोयीचं आणि जलद होणार आहे. विशेषत: दिवाळी सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर या मार्गावर प्रवाशांची गर्दी वाढण्याची शक्यता आहे.'समुद्र पुन्हा हसला!' निसर्गाच्या कुशीतून सुरू झाला प्रवासाचा नवा अध्याय पावसाळ्यातील काळोख हटून आता किनाऱ्यावर निळसर झळाळी उतरली आहे. समुद्राच्या मंद तालावर हेलकावे घेतभाऊचा धक्का ते रेवस अशी बोट पुन्हा सज्ज झाली आहे कोकणाच्या निसर्गसंपन्न किनाऱ्यांकडे प्रवाशांना घेऊन जाण्यासाठी!

हवामानातील कोणताही बदल लक्षात घेऊन प्रवाशांनी प्रवासापूर्वी मुंबई जलवाहतूक संस्थेच्या अधिकृत वेळापत्रकाची माहिती घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भारतातील बाललैंगिक गुणोत्तर - १००० मुलांमागे फक्त ९२९ मुली



**डॉ. राजेंद्र बगाटे**

दरवर्षी ११ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट मुलींच्या हक्कांबद्दल जागरूकता निर्माण करणे, त्यांना शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता यासारख्या मूलभूत सुविधांचा लाभ मिळवून देणे आणि समाजातील लिंगसमानतेची स्थिती सुधारण्याकडे लोकांचे लक्ष वेधणे हे आहे. मात्र, या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर भारतातील मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येतील गंभीर असमानता चिंतेचा विषय ठरते. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (NFHS-5, 2019–21) नुसार भारतात जन्मावेळी लिंग गुणोत्तर, म्हणजेच प्रत्येक १,००० मुलांमागे जन्मलेल्या मुलींची संख्या फक्त ९२९ इतकी आहे. ही संख्या नैसर्गिक गर्भलिंग गुणोत्तराच्या (९५२ मुली प्रति १,००० मुले) तुलनेत खूपच कमी आहे. ही विकृती फक्त आकडेवारीवर आधारित समस्या नाही, तर समाजातील मुलींबाबत असलेले मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक भेद स्पष्ट करते.

नैसर्गिक गर्भलिंग गुणोत्तर साधारणतः ९५२ मुली प्रति १,००० मुले असते, हे नैसर्गिक प्रक्रिया आणि जैविक घटकांच्या परिणामस्वरूप तयार होते. मात्र भारतातील मुलींच्या जन्मातील घट ही समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून गंभीर समस्या आहे. मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येत घट हा लिंगभेद, सामाजिक अपेक्षा, मुलींबाबतच्या आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनाशी निगडीत आहे. काही भागांत मुलींचे जीवन कमी महत्त्वाचे मानले जाते, मुलींचे शिक्षण, आरोग्य आणि पोषण यामध्ये पुरुषांच्या तुलनेत कमी गुंतवणूक केली जाते, त्यामुळे मुलींचा दर्जा सामाजिकदृष्ट्या कमी होतो.

भारतामध्ये मुलींच्या जन्माला येण्याच्या संख्येतील घटाचे कारण बहुप्रकारे आहे. सर्वप्रथम, लिंग निवडीच्या प्रथांचा विचार करता येतो. गर्भधारणेदरम्यान मुलींचे लिंग ठरवून, गर्भपात करून किंवा मुलींचा जन्म टाळण्याच्या प्रथांमुळे जन्मावेळी मुलींच्या संख्येत घट होते. लिंग निवडीच्या प्रथा, ज्या मुलींचा जन्म टाळण्यासाठी किंवा गर्भावस्थेत लिंग ठरवून गर्भपात करण्यासाठी केल्या जातात, या समस्येचे मूळ कारण आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गर्भातील लिंग ठरवणे, मग ते अवैध असले तरी, काही भागांत अजूनही चालू आहे. या प्रथेमुळे फक्त मुलींच्या जन्माला येण्याच्या संख्येत घट होत नाही, तर समाजात मुलींबाबतचा दृष्टिकोन, त्यांच्या मूल्याची कल्पना आणि लिंगसमानतेची स्थितीही ढासळते. मुलींचा जन्म सामाजिक आव्हान मानला जातो, कधी आर्थिक भार म्हणून, तर कधी सामाजिक मर्यादा आणि सांस्कृतिक रूढींच्या आधारे कमी महत्त्वाचा मानला जातो. ही प्रथा केवळ भारतापुरती मर्यादित नसून, काही अन्य आशियाई देशांमध्येही दिसून येते, मात्र भारतात तिचा सामाजिक आणि सांस्कृतिक प्रभाव विशेष स्पष्ट आहे. मुलींच्या जन्मावर असलेला आर्थिक आणि सामाजिक दबाव देखील यामागे मुख्य कारण आहे. लग्नाचा खर्च, मुलींच्या शिक्षणाचा भार, आणि मुलींच्या भविष्याबाबत असलेली सुरक्षिततेची चिंता यामुळे अनेक कुटुंब मुलींच्या जन्माला प्राधान्य देत नाहीत. या मानसिकतेत बदल करणे आणि मुलींचे मूल्य उंचावणे हे समाजाच्या प्रत्येक घटकावर अवलंबून आहे.

भारत सरकारने या समस्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदेशीर उपाययोजना उपाययोजना राबविल्या आहेत. Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques (PCPNDT) Act, 1994 ह्या कायद्याद्वारे गर्भावस्थेत लिंग निर्धारणावर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. हा कायदा मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येतील असमानतेवर नियंत्रण ठेवण्याचा एक महत्त्वाचा आधार आहे. तथापि, काही ठिकाणी या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे नाही, ज्यामुळे लिंग निवडीच्या प्रथा काही प्रमाणात अजूनही चालू आहेत. त्यामुळे केवळ कायदे नाही तर समाजातील मानसिकतेत बदल आणणे गरजेचे आहे. मुलींचे शिक्षण, आरोग्य, पोषण आणि सुरक्षिततेची हमी देणे, त्यांच्या सामाजिक मूल्याची दखल घेणे आणि त्यांच्या विकासासाठी योग्य वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. उदा. हरियाणा राज्यातील पंचकुला जिल्ह्यात २०२५ मध्ये लिंग गुणोत्तर सुधारले असून ते ९५१ वर पोहोचले आहे, जे २०२४ मध्ये ९१४ होते. या सुधारणामागे PCPNDT कायद्याची कठोर अंमलबजावणी, MTP कायद्याची अंमलबजावणी, जिल्हा प्रशासनाची समन्वयित कार्यवाही आणि जनजागृती मोहिमांचा मोठा वाटा आहे. पंचकुला प्रशासनाने १३७ PNDT केंद्रांची, ४६ MTP केंद्रांची आणि १५ BAMS क्लिनिकांची तपासणी केली, ज्यामुळे लिंग गुणोत्तरात सुधारणा साधली गेली. तथापि, गाझियाबाद (उत्तर प्रदेश) येथे २०२५ मध्ये लिंग गुणोत्तर ८५३ वर खाली आले आहे, जे बेकायदेशीर गर्भपात केंद्रे आणि लिंग निवडीच्या प्रथांमुळे आहे. या ठिकाणी प्रशासनाने उपाययोजना राबवल्या असल्या तरी समस्या अजूनही गंभीर आहे.

यासोबतच सामाजिक उपाययोजनाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. 'बेटी बचाओ बेटी पढाओ' योजना ही या दिशेने एक महत्वाचा उपक्रम आहे. या योजनेचा उद्देश मुलींच्या जन्माचे स्वागत करणे, त्यांचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि लिंगभेद कमी करणे आहे. या योजनेअंतर्गत मुलींच्या आरोग्य, पोषण, शिक्षण आणि सुरक्षिततेसाठी विविध कार्यक्रम राबवले जातात. शाळा, सामाजिक संस्था आणि स्थानिक समुदाय यामार्फत मुलींच्या हक्कांबाबत जनजागृती केली जाते. समाजात लिंगसमानतेबाबत मानसिकतेत बदल आणण्यासाठी प्रत्येक स्तरावर प्रयत्न आवश्यक आहेत. मुलींच्या विकासासाठी पालक, शिक्षक, प्रशासन आणि समाजाने एकत्रित काम करणे अत्यावश्यक आहे.

मुलींची जन्माला येणाऱ्या संख्येत घट ही फक्त आकडेवारी किंवा सामाजिक प्रश्न नाही, तर त्याचा परिणाम देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासावरही होतो. हा प्रश्न समाजाच्या नैतिकतेची, मूल्यांची आणि विकासाची परीक्षा आहे. लिंगभेदामुळे महिलांवरील हिंसा, लैंगिक छळ आणि समाजातील असमानतेची स्थिती अधिक वाढते. परिणामी, मुलींच्या सुरक्षिततेसाठी आणि समाजाच्या संतुलनासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. मुलींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणे, त्यांना समान संधी देणे, आणि लिंगभेदाच्या सर्व प्रकारांना विरोध करणे हेच खरे उद्दिष्ट असावे. मुलींचे योग्य स्वागत करणे, त्यांना शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता याची हमी देणे, तसेच लिंगभेदाच्या सर्व प्रकारांना विरोध करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय बालिका दिन हा केवळ उत्सव नाही, तर मुलींच्या सुरक्षितता, शिक्षण, आरोग्य आणि लिंगसमानतेसाठी जनजागृतीचा दिवस आहे. या दिवसाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिक, पालक, शिक्षक, प्रशासक आणि समाजातील घटक मुलींच्या हितासाठी, लिंगसमानतेसाठी आणि समाजाच्या नैतिक विकासासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.


शेवटी, मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येत घट ही केवळ आकडेवारी नाही, तर समाजाच्या नैतिकतेची, मूल्यांची आणि विकासाची परीक्षा आहे. मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येत घट हा समाजातील लिंगभेद आणि मुलींबाबतच्या मानसिकतेचा स्पष्ट सूचक आहे. मुलींच्या सुरक्षिततेसाठी, शिक्षणासाठी आणि सामाजिक विकासासाठी सर्व स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय बालिका दिन हा केवळ उत्सव नाही; तो मुलींच्या सुरक्षितता, शिक्षण, आरोग्य, आणि लिंगसमानतेसाठी मुलींच्या अधिकारांसाठी जनजागृतीचा दिन आहे. मुलींचे योग्य स्वागत करणे, मुलींचा जन्म स्वागतार्ह असावा, त्यांना शिक्षण, पोषण आणि सुरक्षितता मिळावी, आणि लिंगभेदाचा पूर्णपणे विरोध केला जावा ही समाजाची जबाबदारी आहे. मुलींना शिक्षणाची आणि विकासाची संधी देणे, तसेच लिंगभेदाच्या सर्व प्रकारांना विरोध करणे हेच या दिवसाचे खऱ्या अर्थाने औचित्य आहे. या दिवसाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिक, पालक, शिक्षक, प्रशासक आणि समाजातील घटक मुलींच्या हितासाठी, लिंगसमानतेसाठी आणि समाजाच्या नैतिक विकासासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.

# ॲड.सुरेश जाधव यांच्या प्रभावी युक्तिवादामुळे आरोपीची निर्दोष सुटका

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (आनंद पवार)**

ठाणे जिल्हा सत्र न्यायालयात दाखल असलेल्या गंभीर स्वरूपाच्या खुनाच्या प्रयत्नाच्या (कलम ३०७,३४ भा.दं. वि.) खटल्यात ॲड.सुरेश दिनकर जाधव यांनी आपल्या सखोल कायदेशीर ज्ञान, पुराव्यांचा अचूक वापर आणि प्रभावी युक्तिवाद यांच्या बळावर आरोपीचा यशस्वी बचाव करून त्याची निर्दोष सुटका करून घेतली आहे.

वर्तकनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा क्रमांक ५२/२०२० नोंदविण्यात आला होता. फिर्यादी सुमित विष्णू गावित (रा. कोकणीपाडा, ठाणे) यांनी तक्रार दाखल केली होती की, आकाश सुकलाल भोये



आणि इतर दोन जणांनी त्याच्यावर चाकू व चॉपरने हल्ला केला. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन सहा . पोलीस आयुक्त श्री. पंकज शिरसाठ यांनी केला.

सदर प्रकरणात आरोपी तुषार गुरुदास पाटील व यश नंदू पाटील (रा.कळवा-ठाणे) यांना १२ फेब्रुवारी २०२० रोजी अटक करण्यात आली. *आरोपी क्रमांक दोन तुषार पाटील यांचा बचाव ॲड. सुरेश दिनकर जाधव यांनी केला,* तर इतर आरोपींचे प्रतिनिधित्व ॲड.राजू गायकवाड व ॲड.सोनवणे यांनी केले.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश ठाणे यांच्या न्यायालयात दीर्घ सुनावणीनंतर शुक्रवार दि.१०ऑक्टोबर २०२५ रोजी निकाल देण्यात आला. न्यायालयाने *ॲड. जाधव यांनी मांडलेला तथ्याधारित, कायद्याच्या तरतुदींवर आधारित बचाव ग्राह्य धरत,आरोपी क्रमांक दोन यांना निर्दोष मुक्त केले. कोर्टकामी ॲड जाधव यांचे सहकारी ॲड गणेश पुजारी यांनी सहकार्य केले*

असिस्टंट पोलीस कमिशनर म्हणून महाराष्ट्र पोलीस दलात उल्लेखनीय सेवा बजावलेले आणि निवृत्तीनंतर वकिली क्षेत्रात प्रवेश केलेले ॲड.सुरेश जाधव यांनी अल्पावधीतच आपल्या प्रगल्भ कायदेशीर अभ्यासाने आणि कौशल्याने न्यायालयीन क्षेत्रात आपली आगळी वेगळी ओळख निर्माण केली आहे.

गुन्हे तपासातील प्रत्यक्ष अनुभव आणि कायद्याच्या सखोल समजुतीच्या आधारे त्यांनी सादर केलेली बाजू न्यायालयास पटली.यामुळे त्यांच्या व्यावसायिकतेचा उच्चांक दिसून आला.

या यशस्वी निर्णयाबद्दल न्यायालयीन वर्तुळ, सहकारी वकील आणि मित्रपरिवाराकडून ॲड.सुरेश जाधव यांचे हार्दिक अभिनंदन होत असून ते नवोदित वकिलांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.

## भाजपा खेरवाडी मंडळ वस्तू आणि सेवा कर जनजागृती व मार्गदर्शन सभेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रविणभाऊ पवार**

आज शुक्रवार दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी मोदी सरकार द्वारा करण्यात आलेल्या वस्तू आणि सेवा कर (G.S.T.) मधील बदललेल्या धोरणा संदर्भात जनजागृती व मार्गदर्शन सभा जैन देरासर, शांताराम भट चाळ, जे.पी. रोड, खार पुर्व मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती.

या प्रसंगी प्रतिक कर्पे CA व हेमंत जांगला Alumni ( llM, Ahmedabad), राजेश दाभोळकर जिल्हा उपाध्यक्ष संयोजक वस्तू व सेवा कर, प्रसाद मरगज जिल्हा सचिव सहसंयोजक वस्तू व सेवा कर यांनी GST विषयावर मार्गदर्शन केले. सुहास आडिवरेकर मुंबई उपाध्यक्ष व अध्यक्ष मुंबई कोकण विकास आघाडी यांनी या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले.

प्रमुख उपस्थिती शितल मकवाना जिल्हा सरचिटणीस, भुवनेश बत्तुल जिल्हा कार्यकारणी




सदस्य, माधुरी नाईक जिल्हा कार्यकारणी सदस्य, लक्ष्मण दुबे जिल्हाध्यक्ष, युवा मोर्चा, उत्तर मध्य मुंबई, कनैया पटेल मंडळ सरचिटणीस माधुरीताई नाईक मंडळ सरचिटणीस, विनायक देठे वॉर्ड अध्यक्ष ९५, अनिल गुप्ता मा. जिल्हा उपाध्यक्ष, ॲड. सुभाष राजोरा, मा. वॉर्ड अध्यक्ष ९६, मयुर बागेरीया उपस्थित होते

या प्रसंगी खेरवाडी मंडळातील वॉर्ड ९५/९६ मधील व्यापारी संघटना व व्यापारी वर्ग आणि उद्योजक त्याचबरोबर पदाधिकारी/कार्यकर्ते ह्या सभेस उपस्थित होते.

# नेरे सरपंच प्रकाश गोपाळ घाडगे यांच्या सरपंच पदाला स्थगिती...

**ग्रामपंचायतीचे काम नियमाने व कायदेशीररित्या सुरू राहील अतिरिक्त विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे आदेश....**

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील नेरे ग्रामपंचायतीचे भाजपचे सरपंच प्रकाश गोपाळ घाडगे यांना जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील ग्रामपंचायत विवाद अर्ज क्रमांक ३०/२०२३, दि. ०९/०९/२०२५चे आदेशास पुढील आदेशापर्यंत" स्थगिती" देण्यात आली आहे.अर्जदाराचा दावा सिध्द करण्यासाठी ॲड. प्रल्हाद खोपकर आणि ॲड. सुरज रमेश म्हात्रे यांनी कायदेशीर बाजू मांडली. सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारे जिल्हाधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयानुसार, वनविभागाच्या जागेवर अतिक्रमण केल्यामुळे प्रकाश गोपाळ घाडगे यांचे सरपंच पद रद्द करण्यात आले होते. परंतु

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १६ (२) नुसार प्रकाश घाडगे यांच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, प्रकाश घाडगे यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १६(२) अन्वये विवाद अर्ज दाखल केला होता. प्रकाश घाडगे हे दिनांक १८/१२/२०२२ च्या निवडणूकीमधून सरपंच पदावर निवडूण आलेले आहेत. प्रकाश घाडगे यांचे विरुध्दची अतिक्रमणाची तक्रार ही खोटी असून, गट विकास अधिकारी व तहसिलदार यांनी स्वतंत्र अहवाल दाखल केले आहेत. प्रकाश घाडगे यांनी ज्या घराचे बांधकाम अतिक्रमणात केलेले आहे, असे दर्शविले आहे. सदरहू घर प्रकाश घाडगे यांच्या आईचे आजोबा कै. गोविंद बाळू बामूगडे यांनी सन १९६१ पूर्वी बांधलेले आहे. ज्या मिळकतीवर हे घर आहे ती मिळकत वन खात्याची आहे ही शासकीय मोजणी झालेली नसल्याने, घराची जागा अतिक्रमणात हे स्पष्ट होत नाहीत. जिल्हाधिकारी रायगड यांनी प्रकाश घाडगे यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत सविस्तर चौकशी न करताच, यांचे सरपंच पद रद्द केलेले आहे. हा प्रकाश घाडगे यांचेवर अन्यायकारक असून, प्रकाश घाडगे हे लोकशाही मार्गाने सरपंच पदावर निवडूण आलेले आहेत. प्रकाश घाडगे यांनी त्यांच्या अपील अर्जात नमूद केलेले मुद्दे विचारात घेता, प्रकाश घाडगे यांचा अर्ज मान्य करुन, शंकर गोपाळ ठाकूर यांनी पूर्वग्रह दूषित भावनेने केलेला अर्ज अमान्य करुन, प्रकाश गोपाळ घाडगे यांचे सरपंच पद नेहमीत राहण्यासाठी जिल्हाधिकारी रायगड यांचे दिनांक ०९/०९/२०२५ रोजीच्या आदेशाला स्थगिती दिली आहे. या स्थगितीमुळे शंकर ठाकूर यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच ग्रामपंचायतीचे काम नियमाने व कायदेशीररित्या सुरु राहील. तरी आव्हानित आदेशास स्थगिती देण्याची विनंती प्रकाश घाडगे यांच्या वकीलांनी केलेली होती.

प्रकाश घाडगे व शंकर ठाकूर यांच्या वकीलांनी केलेला युक्तीवाद, आव्हानित आदेश व उपलब्ध कागदपत्र यांचे अवलोकन करता, नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता, कोकण विभाग अतिरिक्त विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या आदेशात प्रकाश घाडगे व शंकर ठाकूर यांचे वकीलांनी केलेला युक्तीवाद, नमूद विवेचन व अपीलार्थी यांनी युक्तीवादात मांडलेले मुद्दे याची सविस्तर तपासणी होणे आवश्यक असल्याने प्रकरण गुणवत्तेवर अंतीम करणेसाठी कालावधी लागणार आहे. त्यामुळे आव्हानित आदेशास पुढील आदेशापर्यंत "स्थगिती" जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील ग्रामपंचायत विवाद अर्ज क्रमांक ३०/२०२३, दि. ०९/०९/२०२५चे आदेशास पुढील आदेशापर्यंत" स्थगिती" देण्यात आली आहे.

# उपराजधानीत धडकला सुमारे पाच लाखांवर ओबीसींचा विशाल जनसागर

## यशवंत स्टेडियम ते संविधान चौक पर्यंत थांबता थांबेना रांगच रांग

## अस्तित्वाच्या हक्कासाठी सकल ओबीसी महामोर्चा आयोजित

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**नागपूर :** महाराष्ट्र शासनाने मराठा व ओबीसी समाजाची दिशाभूल फसवणूक करून जो नियमबाह्य पद्धतीने ०२ सप्टेंबरचा थोतांड जीआर काढला तो तातडीने रद्द करा या मागणीसाठी ( शुक्रवार १० ऑक्टों.) ला सकल ओबीसी वतीने यशवंत स्टेडियम ते संविधान चौक पर्यंत ३ किलोमीटरचा विशाल मोर्चा काढला. विशेष म्हणजे या महा मोर्चाला विदर्भासह महाराष्ट्रातील सुमारे ५ लाखांहून अफाट ओबीसींचा जनसमुदाय लोटला होता. व प्रत्येक ओबीसी बांधव हे पिवळ्या पोषाखात उपराजधानीत दिसत होते.

या सकल ओबीसी महामोर्चाला संविधान चौकात ओबीसी नेते आ. विजय वडेट्टीवार, राष्ट्रीय ओबीसी आरक्षण हक्क परिषद व अखिल भारतीय वीरशैव लिंगायत "शिवा" संघटनेचे अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे, खासदार डॉ. प्रशांत पडोळे, ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके, माजी मंत्री अनिल देशमुख यांनी संबोधले. आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले की, या थोतांड जीआर विरोधात मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देणारे व पहिला याचिका दाखल करणारी अखिल भारतीय वीरशैव लिंगायत युवक शिवा संघटना आहे. परवाच मुंबईत त्यांनी आझाद मैदान दणाणून सोडले होते. हा थोतांड जीआर जोपर्यंत रद्द होत नाही तोपर्यंत




हे आंदोलन अजूनच तीव्र केले जाईल. शिवा संघटना राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे म्हणाले की, शासन काय आम्हाला अनपढ गावंढळ समजत आहे का.? जे नियमातच नाही असा मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी व मराठा समाजाची दिशाभूल फसवणूक करणाऱ्या शासनाला आता अख्ख्या महाराष्ट्रातील चहुबाजूंनी घेरण्याचा सज्जड इशारा दिला आहे.

या महामोर्चात मागण्या ह्या होत्या की, काळा जीआर तात्काळ रद्द करा, मराठ्यांचे ओबीसीकरण करणारा दिनांक २ सप्टेंबरचा अन्यायकारक आणि संविधानविरोधी जीआर सरकारने तत्काळ रद्द करावा. खोटे कुणबी दाखले देणे थांबवा, मराठा समाजाला खोटे कुणबी दाखले देण्याचे षडयंत्र त्वरित थांबवून, आतापर्यंत दिलेल्या बोगस दाखल्यांची चौकशी करून श्वेतपत्रिका काढावी. जातिनिहाय जनगणना करा. ओबीसींची खरी लोकसंख्या निश्चित करण्यासाठी आणि 'जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी हिस्सेदारी' या तत्त्वानुसार हक्क देण्यासाठी देशव्यापी जातिनिहाय जनगणना तात्काळ सुरू करावी. लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण व निधी द्या. ओबीसी समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात शिक्षण, नोकरी आणि राजकीय प्रतिनिधित्व द्यावे तसेच ओबीसी समाजाच्या विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा. अश्या रास्त मागणी घेऊन सुमारे पाच लाखांवर ओबीसींचा जनसमुदाय प्रत्येक हातात मागणी फलक, निदर्शने फलक घेऊन या महामोर्चात सहभागी झाले होते. तर तेथील वृत्तसंकलन आमचे प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ भंडारा जिल्हा अध्यक्ष आशिष चेडगे यांनी केले आहे. सकल ओबीसी महामोर्चाला आलेल्या सर्व ओबीसी समाजातील बांधवांचे आयोजकांनी आभार मानले व हृदयातून बोलले की आज हा जो जनसमुदाय दिसत आहे यापेक्षा अख्ख्या महाराष्ट्रातील प्रचंड ओबीसी समाजबांधवांच्या संख्येची जणू सुनामी धडकणार हे महाराष्ट्र शासनाचे लक्षात घेऊन आमच्या मागण्या तातडीने पूर्ण करावे. अन्यथा कोणत्याही स्तरापर्यंत ओबीसी समाज जाण्यासाठी मागे पुढे पाहणार नाही याची सरकारने नोंद घ्यावी.

# बुटांसह गणवेशातही बदलाची गरज – पोलिस निरीक्षक बनसोडे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**दैनिक युवक आधार / मुंबई :** अभिनेता अक्षय कुमार यांनी नुकत्याच घेतलेल्या मुख्यमंत्र्यांच्या मुलाखतीत पोलिस दलासाठी वापरले जाणारे बूट बदलण्याची मागणी केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही मागणी तत्काळ मान्य केली. मात्र केवळ बुटांपुरते बदल मर्यादित न ठेवता संपूर्ण पोलिस गणवेश आधुनिक आणि कार्यक्षम बनविण्याची गरज असल्याचे मत पोलिस निरीक्षक राजेंद्र बनसोडे यांनी व्यक्त केले आहे. त्यांनी यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना खुले पत्र पाठवले आहे.

जालना पोलिस प्रशिक्षण अकादमीतील बनसोडे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की सध्याचा पोलिसांचा खाकी गणवेश हा केवळ असुविधाजनक नाही, तर ब्रिटिशकालीन गुलामगिरी आणि दडपशाहीची आठवण करून देणारा आहे. "आजचे पोलीस हे जनतेचे मित्र आहेत; त्यामुळे त्यांचा गणवेशही आधुनिक, सोयीस्कर आणि लोकाभिमुख असणे आवश्यक आहे," असे त्यांनी नमूद



केले आहे.

**BPRDचा २०१७ चा अहवाल दुर्लक्षित**

बनसोडे यांनी पत्रात केंद्र सरकारच्या ब्युरो ऑफ पोलीस रिसर्च अँड डेव्हलपमेंट (BPRD) या संस्थेने नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन (NID), अहमदाबाद यांच्या सहकार्याने २०१७ मध्येच पोलिस गणवेशावरील सविस्तर अभ्यास अहवाल सादर केला असल्याची आठवण करून दिली आहे. या अहवालात पोलिसांसाठी हवामानास अनुकूल, कार्यक्षम आणि आरामदायी अशा नऊ स्मार्ट गणवेश डिझाइन्स सुचवण्यात आले होते. मात्र तो अहवाल गेली अनेक वर्षे अंमलात आणला गेलेला नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली आहे.

**सध्याच्या गणवेशातील त्रुटी**

बनसोडे यांच्या मते, सध्याच्या गणवेशाचे कापड जाड असल्याने उन्हाळ्यात गैरसोय होते, मोबाईल किंवा आवश्यक वस्तू ठेवण्यासाठी जागा नाही, लेदरचे बूट धावपळीत अडथळा ठरतात आणि रात्रीच्या वेळी खाकी रंग सहज दिसत नाही. तसेच अनेक सरकारी आणि खाजगी कर्मचाऱ्यांकडेही समान रंगाचे गणवेश असल्याने पोलिसांची स्वतंत्र ओळख धूसर झाली आहे.

**'स्मार्ट' गणवेशाची वैशिष्ट्ये**

BPRD–NID च्या संशोधनानुसार सुचवलेला नवीन गणवेश हलक्या बेज रंगाच्या शर्टसह आणि अर्थी ब्राऊन रंगाच्या पॅन्टसह असणार आहे. त्यासाठी हलके, अँटी-बॅक्टेरियल आणि हवामानास अनुरूप कापड वापरण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच अँटी-स्किड, आग प्रतिरोधक बूट, मोबाईल व साधनांसाठी कप्पे असलेला बेल्ट, तसेच आरामदायी टोपी, जॅकेट आणि रेनवेअरचा समावेश करण्यात आला आहे.

**"समग्र सुधारणा आवश्यक"**

मुख्यमंत्र्यांनी केवळ बुटांच्या बदलावर मर्यादित विचार न करता, गणवेशाच्या सर्वांगीण सुधारणा करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करावी, अशी मागणी बनसोडे यांनी केली आहे. हवामानातील बदल, १२ ते १४ तासांची ड्युटी, आधुनिक उपकरणांचा वापर यांचा विचार करून 'स्मार्ट' आणि 'वर्क-फ्रेंडली' गणवेश ठरवावा, असे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

"महाराष्ट्राने देशाला दिशा दाखवण्याची परंपरा कायम ठेवावी. पोलिसांच्या गणवेशात आमूलाग्र बदल करून त्यांना आधुनिक आणि आत्मसन्मान वाढवणारी ओळख देण्याची ही योग्य वेळ आहे," असा विश्वास बनसोडे यांनी व्यक्त केला आहे.

## वीजपुरवठा खंडित करून नागरिकांना त्रास देणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करा - आ.प्रशांत ठाकूर यांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

गेल्या दोन दिवसांपासून पनवेल ते खारघर परिसरातील विविध ठिकाणी जाणूनबुजून वीजपुरवठा खंडित करून नागरिकांना त्रास देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या पार्श्वभूमीवर जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली आहे.

या संदर्भात शुक्रवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत डीसीपी प्रशांत मोहीते, सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले, तसेच एमएसईबीचे अधिकारी डी. आर. पाटील यांच्यात बैठक पार पडली. या बैठकी दरम्यान एमएसईबीच्या अधिकाऱ्यांनी संप मागे घेतल्याची कबुली दिली, तसेच पुढील एक ते दीड तासांत वीजपुरवठा पूर्ववत होईल, असे आश्वासन दिले. याशिवाय, वीजपुरवठा खंडित करण्यामागे जबाबदार ठरलेल्या कर्मचाऱ्यांवर सक्त कारवाई करण्यात येईल, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, कालही या विषयावर पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती. या बैठकीला उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंजारराव,



केदार भगत, पिंट्या उर्फ प्रीतम म्हात्रे, रुपेश नागवेकर, पवन सोनी, उमेश इनामदार, एनपी बिल्डर्सचे प्रशांत पाटील, तसेच ओरियन मॉलचे पूर्णंदू साळवी यांच्यासह स्थानिक व्यापारी व उद्योजक उपस्थित होते.

बैठकीनंतर आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना, संपाच्या आड नागरिकांना त्रास देणाऱ्यांवर संतप्त ताशेरे ओढले. त्यांनी म्हंटले कि, पनवेल पासून खारघरपर्यंत विविध ठिकाणी परवाच्या दिवसापासून वीज पुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे वीज वितरण कंपनीच्या विरोधात नागरिक प्रचंड संतप्त झाले होते त्यांनी एमएसईबी, एमएसईडीसीएल पोलीस स्टेशन गाठले. संपाचा गैरफायदा घेत जाणीवपूर्वक वीज पुरवठा खंडित करण्याचे प्रकार घडले. त्यामुळे या संदर्भात आज डीसीपी प्रशांत मोहिते यांच्या सोबत बैठक घेतली. पनवेलच्या बाजारपेठेत तर प्रचंड प्रमाणात उद्रेक पहायला मिळाला. मोहोल्ला विभागातील नागरिकांची लाईट नव्हती एसटी डेपो व रेल्वे स्थानक नजीक झोपडपट्टीमंध्येही तीच परिस्थिती होती त्यामुळे काहींनी रास्ता रोको केला. हि वेळ ज्यांच्यामुळे आली ज्यांनी जाणीवपूर्वक वीज पुरवठा खंडित केला आणि कुठला वीज पुरवठा खंडित करायचा हे ज्ञान आहे अशाच लोकांनी ते कृत्य केले आहे. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी डीसीपी प्रशांत मोहिते यांच्याकडे केली असल्याचे सांगितले. आता संप मिटला आहे मात्र कुणी विनाकारण वीज पुरवठा बंद केला तर आम्हाला कळवा, आमचे भाजपचे पदाधिकारी निश्चितच या संदर्भात पाठपुरावा करतील. नागरिकांना त्रास झाला आहे, त्याच्यावर ईलाज झाला पाहिजे पुन्हा अशा पद्धतीने मनमर्जी करत नागरिकांना त्रास होऊ नये आणि त्यासाठी पोलीस प्रशासनाने या प्रकरणातील दोषींना शासन करावे, असे अधोरेखित केले.

# धकाधकीच्या जीवनामध्ये आरोग्याची काळजी घेणे महत्वपुर्ण– माजी सभागृहनेते परेश ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

धकाधकीच्या जीवनामध्ये आरोग्याची काळजी घेणे महत्वपुर्ण झाले आहे, असे प्रतिपादन पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी सायकल साहस मोहिमेच्या शुभारंभावेळी केले. तसेच या महिमेमुळे इतरांनाही आपल्या



आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्रेरणा मिळेल असे सांगीतले. सायकलींच्या माध्यमातून आरोग्य, निसर्ग संवर्धन आणि इंधन बचतीबाबात जनजागृतील निर्माण करण्यासाठी राजकिशोरी लांगे यांच्यावतीने पनवेल ते दुर्गराज रायगड सायकल मोहिम १० आणि ११ ऑक्टोबर दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. या मोहिमेचा शुभारंभ पनवेल महापालिकेचे माजी सभागृगहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झेंडा दाखवून करण्यात आला. यावेळी त्यांनीही सायकलींग करुन मोहिमेत सहभाग घेतला. यावेळी राजकिशोरी लांडगे, राजेश देशपांडे, रंगनाथ मुगळिहाळ, विवेक आपटे, सोनल भोमे, अमोल समुद्र, चंद्रशेखर कमल, विष्णू जगताप, मंगल भानुशाली, भुजंग लोखंडे, लक्ष्मण नलावडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.